POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६६ ● मुंबई, शनिवार, १७ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईतील विजयी उमेदवारांची नावे

- प्रभाग क्रमांक १ - रेखा पादव (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक २ - तेजस्वी घोसाळकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ३ - प्रकाश दरेकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ४ - मंगेश पांगरे (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक २ - संजय घाठी (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक ६ - विक्षा कारकर (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक १ - शिवानंद शेट्टी (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १३ - राणी द्विवेवी निघुट (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १४ - सीमा शिंदे (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १५ जिगणासा शाह (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २० - दीपक तावडे (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २९ - लीना देहरकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २२ - हिमांशु पारेख (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २४ - खाती जयरवाल (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २५ - निशा परुळेकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २६ - धर्मेंद्र काळे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ३६ - सिद्धार्थ शर्मा (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ३७ - योगिता कदम (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ३८ - सुरेखा परब (मनसे)
- प्रभाग क्रमांक ४० - तुळशीराम शिंदे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ४१ - सुहास वाडकर (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ४२ - धनश्री भरहकर (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक ४७ - तेजिंदर तिवाना (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ४९ संगीता कोळी (काँग्रेस)
- प्रभाग क्रमांक ५० - राजपूत प्रतापसिंह (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ५१ - वर्षा टंबवलकर (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक ५२ - प्रीती साटम (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ५५ - हर्ष पाटीत (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ५७ - रामचंद्र पिल्ले (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ५८ - संदीप पटेल (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ६० - सापली कुलकर्णी (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ६१- दिव्या सिंह (काँग्रेस)
- प्रभाग क्रमांक ६२ - जिशान मुलतानी (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ६३ - रुपेश सावरकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ६५ - विठ्ठल बंधेरी (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ६६ - हैदर मेहर मोहसीन काँग्रेस
- प्रभाग क्रमांक ७३ - लोणा रावत (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांग ७५ - प्रमोद सावंत (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांग ७६ - प्रकाश मुसळे (भाजपा)
- प्रभाग क्रमांग ७७ - शिवानी परब (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ८३ - सोनाली साठे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ८४ - विद्या भरतआर्य कांगणे (मनसे)
- प्रभाग क्रमांक ८५ - मिलिंद रामनाथ शिंदे (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ८७ - पूजा विश्वनाथ महाडेवर (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ८८ - शर्वरी परब (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ८९ - गितेश राऊत (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ९८ - अलका केरकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १०३ - हेतल मोरवेकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १०४ - प्रकाश गंगाधरे (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १०५ - अनिता वैती (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १०६ - प्रभाकर शिंदे (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १०७ - नील सोमण्या (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १०८ - दीपिका धाग (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ११० - चिराध मोहन (मनसे)
- प्रभाग क्रमांक १११ - दीपक सावंत (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक ११२ - साक्षी दळती (भाजपा)
- प्रभाग क्रमांक ११५ - ज्योती राजभोज (मनसे)
- प्रभाग क्रमांक १२३ - सुनील मोरे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १२४ - सकीना शेख (राष्ट्रवादी अजित पवार)
- प्रभाग क्रमांक १२६ - अर्चना भालेराव (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १२८ - सई शिर्के (मनसे)
- प्रभाग क्रमांक १३४ - मेहजबीन खान (एमआयएम)
- प्रभाग क्रमांक १३५ - नवनाथ बन (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १३६ - जमीर कुरेखी (एमआयएम)
- प्रभाग क्रमांक १३७ - पटेल समीर रमजान (एमआयएम)
- प्रभाग क्रमांक १३८ - रोशन शेख (एमआयएम)
- प्रभाग क्रमांक १४१ - विठ्ठल लोकरे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १४५ - खेरुनिस्सा अकबर हुसैन (एमआयएम)
- प्रभाग क्रमांक १४६ - समृद्धी काते शिक्सेना शिंदे
- प्रभाग क्रमांक १४७ - प्रशा सदाफुले (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक १४९ - अंजली नाईक (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमाक १५६ - अशिनी माटेकर (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक १५८ - चित्रा सांगळे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १५९- चित्रा सांगळे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १६३ - शैला लांडे (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक १६५ - आशरफ आझमी (काँग्रेस)
- प्रभाग क्रमांक १६६ - मीनल तुर्डे (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक १६७ - डॉसमन आझमी (काँग्रेस)
- प्रभाग क्रमांक १७० - बुशरा मलिक (राष्ट्रवादी अजित पवार
- प्रभाग क्रमांक १७४ - साक्षी कनोजिया (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १७५ - मानसी सातमकर (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक १८२ - मिलिंद वैद्य (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १८३ - आशा काळे (काँग्रेस)
- प्रभाग क्रमांक १८५ - टीएम जगदीश (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १८६ - अर्चना शिंदे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १८७ - जोसेपा कोळी (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १८८ - भारकर शेट्टी (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक १८९ - हर्षला मोरे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १९० - वैशाली पाटणकर (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १९३ - हेमांगी वरळीकर (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १९४ - निशिकांत शिंदे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १९५ - विजय बाणगे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक १९६ - पद्मजा चेंबूरकर (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक २०० - उर्मिला पांचाळ (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक २०३ - श्रद्धा पेडणेकर (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक २०४ - किरण तावडे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक २०५ - सुप्रिया दळवी (मनसे)
- प्रभाग क्रमांक २०६ - सचिन पडवळ (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक २०७ - रोहिदास लोखंडे (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २०८ - रमाकांत रहाटे (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक २०९ - यामिनी जाधव (शिवसेना शिंदे)
- प्रभाग क्रमांक २१० - सोनम जामसूतकर (शिवसेना ठाकरे)
- प्रभाग क्रमांक २१२ - अब्रहणी अमरीन शेहझाद (सपा)
- प्रभाग क्रमांक २१४ - अजय पाटील (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २१५ - संतोष ढाले (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २१६ - राजश्री भातणकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २१७ - गौरंग झवेरी (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २१८ - नेहरू तेंडुलकर (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २१९ - सन्त्री सानप (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २२१ - आकाश पुरोहित (भाजपा)
- प्रभाग क्रमांक २२७ - गौरवी नार्वेकर (भाजपा)



# मुंबईत 'महायुती'चा झंझावात!

## भाजप-शिंदे गटाने गाठलं 'शतक' महापालिकेत सत्तांतराचे स्पष्ट संकेत

■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आज मोठा उलटफेर पाहायला मिळत आहे. मतमोजणी जसजशी पुढे सरकत आहे, तसतसे मुंबईवर 'महायुती'चे वर्चस्व अधिक गडद होताना दिसत आहे. भारतीय जनता पक्ष आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने एकत्रितपणे १०६ जागांवर आघाडी घेत शतकी टप्पा ओलांडला आहे. आता मुंबईच्या सत्तेसाठी आवश्यक असलेला ११४ चा आकडा (मॅजिक फिगर) गाठण्यासाठी महायुतीला केवळ ६ जागांची गरज आहे.

हाती आलेल्या ताज्या कलानुसार, भारतीय जनता पक्षाने मुंबईत आपली ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. ८५ जागांवर आघाडी घेत भाजपने मुंबईतील सर्वात मोठा पक्ष म्हणून झेप घेतली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही २१ जागांवर आघाडी मिळवत महायुतीची पकड मजबूत केली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांची रणनीती यशस्वी ठरल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

### ठाकरे बंधूंची युती पिछाडीवर

मुंबईच्या सत्तेसाठी २० वर्षांनंतर एकत्र आलेल्या उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीला मुंबईकरांनी अपेक्षित प्रतिसाद दिल्याचे दिसत नाही. शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे यांच्या युतीला केवळ ६७ जागांवर समाधान मानावे लागले आहे. यामध्ये ठाकरे गट ५८ तर मनसे ९ जागांवर आघाडीवर आहे. मराठी मतांच्या मुद्द्यावर एकत्र आलेल्या या बंधूंना महायुतीच्या 'विकास' आणि 'डबल इंजिन' सरकारच्या अजेंड्याने रोखल्याचे चित्र आहे.

### विजयी आकडेवारीचा वेगवान कल

भाजप : ८५ (आघाडी)

शिवसेना (शिंदे गट) : २१ (आघाडी)

शिवसेना (ठाकरे गट) : ५८ (आघाडी)

मनसेः ०९ (आघाडी)

महायुती एकूण : १०६

मुंबई महापालिकेत गेल्या अनेक दशकांपासून असलेल्या सत्तेला यंदा सुरुंग लागण्याची शक्यता आहे. महायुतीच्या या घोडदौडीमुळे भाजप आणि शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, मुंबईच्या गल्लीबोळात गुलालाची उधळण सुरू झाली आहे. "हा विजय मुंबईच्या विकासाचा आणि जनतेच्या विश्वासाचा आहे," अशा प्रतिक्रिया महायुतीच्या नेत्यांकडून उमटत आहेत.



# ४५ वर्षात पहिल्यांदाच...

## मुंबईवर भाजपची सत्ता, आता कुणाला महापौर करणार?

### ११४ आकड्यांची मॅजिक फिगर

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २२७ जागा आहेत. महापौर पदासाठी ११४ जागांची गरज आहे. सध्याचे निकाल पाहता भाजपचे ९० नगरसेवक तर शिंदे सेनेला २८ जागांचे गणित पाहता या महायुतीकडे ११८ जागांचे समीकरण जुळत आहे. त्यामुळे भाजपचा महापौर होणार हे निश्चित मानले जात आहे. त्यामुळे इतर पक्षांचा टेकू न घेता मॅजिक फिगर महायुती गाठली आहे. आता महापौर कोण होणार याची उत्सुकता आहे. भाजपकडून मुंबईचा पहिला महापौर होण्याचे भाग्य कुणाला लाभते यावर खल सुरू आहे. पार्टी विथ डिफरन्स म्हणवणारी भाजप महापौर पदासाठी कुणाचे नाव पुढे करते याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत भाजप महापौर पदासाठी कोणता प्रयोग राबवते आणि कुणाला या पदाची सूत्र सोपवते याविषयी चर्चा सुरू आहे. भाजप महिलेला हे पद देणार की गुजराती, हिंदी भाषिकांची वर्णी लावणार यावरही खल सुरू आहे. तर भाजपने यापूर्वी वायदा केल्याप्रमाणे एखाद्या मराठी माणसाला महापौर पदाची लॉटरी लागणार हीच खास चर्चा आहे.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईसह राज्यातील जवळपास २५ महापालिकेत भाजपने मित्र पक्षांसह विरोधकांचा धुव्वा उडवलाच. पण मित्र पक्षांचे उधळलेल्या वारूला लगामही घातला. मित्र पक्षांची अवस्था असून नसल्यासारखी झाली. या महापालिका निवडणुकीत शिंदेसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादीची जी अवस्था झाली, ती विचार करायला लावणारी आहे. गेल्या २५ वर्षांपासून मुंबईवर उद्धव ठाकरे यांचा वरचष्मा होता. भाजपची देशात लाट आल्यापासून भाजप या निवडणुकीत धडका देत होती. पण यंदा पहिल्यांदाच भाजपला गेल्या 45 वर्षातील सर्वात मोठे यश मिळाले. बृहन्मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप पहिल्यांदाच मोठा पक्ष म्हणून नावारुपाला आली. आता महापौर कोण होणार याची चर्चा रंगली आहे. तर भाजप मराठी महापौर करणार की हिंदी भाषिक महापौर बसवणार यावरूनही राजकारण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. देशातील सर्वात मोठी महापालिका असलेल्या मुंबई महापालिकेवर भाजपचा झंझावात दिसून आला. बीएमसीच्या २२७ जागांपैकी भाजपला ११८ जागांवर विजय जवळ केला आहे. तर सध्या ९० जागा खिश्यात घातल्या आहेत. तर दुसरीकडे शिंदे सेना २८ जागांवर आघाडीवर आहे. यानिकालातून भाजपने मोठा विजय मिळवल्याचे अधोरेखीत होत आहे. बहुमताच्या आकडेवारीमुळे भाजपचा पहिल्यांदाच मुंबईत महापौर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई महापालिकेच्या इतिहासात आतापर्यंत भाजपचा कोणताही नेता महापौर होऊ शकला नाही. गेल्यावेळी ती संधी चालून आली असतानाही भाजपने नाराजी असतानाही एकीकृत शिवसेनेच्या महापौराला पाठिंबा दिला होता. महापौर निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या उमेदवाराला मोठ्या मनाने पाठिंबा दिला होता. आता भाजपने सत्ता मिळवल्याने भाजपचा महापौर कोण होणार याची चर्चा होत आहे.

# राज्यात ६५ उमेदवार बिनविरोध बनले नगरसेवक

## निवडणूक आयोगाने जारी केली यादी, भाजपाचे सर्वाधिक...

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील २९ महापालिकांचे निकाल आता समोर आले आहे. मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या प्रमुख महापालिकांमध्ये भाजपा महायुतीने जोरदार विजय मिळवला आहे. मुंबईत गेल्या २५ वर्षांची ठाकरेंची सत्ता पालटत भाजपाने महायुतीने तब्बल १३० जागांपर्यंत मुसंडी मारली आहे. मुंबईत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्याचा फार मोठा परिणाम दिसून आला नाही. मराठी बहुल भागात उद्धवसेना-मनसेला मिळालेल्या यशामुळे किमान ६५ जागांपर्यंत ठाकरे बंधूंना मजल मारता आली आहे. राज्यात मतदानापूर्वी काही ठिकाणी बिनविरोध उमेदवार निवड झाली होती. त्याला राज्य निवडणूक आयोगाने मान्यता देत त्यांची यादी जाहीर केली आहे.







# हा कौल प्रगतीचा, अधिक गती देणारा...

## पालिका निवडणुकीत भाजपच्या अभूतपूर्व यशानंतर पंतप्रधान मोदींची पहिली प्रतिक्रिया



गुरुवारी राज्यातील २९ महापालिका निवडणुकांसाठी मतदार प्रक्रिया पार पडली होती. त्यानंतर आज आता महापालिका निवडणुकांचे निकाल हाती आले आहेत. आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार राज्यात भाजपाला मोठं यश मिळालं आहे. २९ महापालिकांपैकी जवळपास २५ महापालिकांमध्ये भाजप आणि महायुतीची सत्ता येणार असल्याचं आता निश्चित झालं आहे. मुंबईमध्ये भाजप शिवसेना युतीनं शिवसेना ठाकरे गट आणि मनसेला मोठा धक्का दिला. तर पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये देखील भाजपला स्पष्ट बहुमत मिळालं असून, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाची पिछेहाट झाली आहे, दरम्यान भाजपला मिळालेल्या या यशानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत भाजपला मिळालेल्या यशाबद्दल जनतेचे आभार मानले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन ट्विट केले आहेत. "महाराष्ट्राचे आभार! राज्यातील उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या अजेंड्याला आपले आशीर्वाद दिले आहेत! विविध महानगरपालिका निवडणुकांचे निकाल हे दर्शवितात की महाराष्ट्रातील जनतेशी एनडीएचे नाते अधिक दृढ झाले आहे. आमच्या कामगिरीचा अनुभव आणि विकासाची दृष्टी जनतेच्या मनाला भावली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा , राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे." असं मोदी यांनी म्हटलं आहे. तर त्यांनी आपल्या दुसऱ्या ट्विटमध्ये महाराष्ट्र भाजपचं अभिनंदन केलं आहे. "महाराष्ट्रभर जनतेसोबत राहून अहोरात्र परिश्रम करणाऱ्या एनडीएच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा मला अभिमान आहे. त्यांनी आमच्या युतीच्या कामगिरीबाबत माहिती देताना, आगामी काळासाठीचा आमचा दृष्टीकोण ही अधोरेखित केला आणि विरोधकांच्या खोट्या आरोपांना प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा." असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

## बिनविरोध आलेले नगरसेवक

**● पिंपरी चिंचवड महापालिका**
- प्रभाग ६ ब - रवी लांडगे(भाजपा)
- प्रभाग १० ब - सुप्रिया चांदगुडे(भाजपा)

**● भिवंडी निजामपूर महापालिका**
- प्रभाग क्रमांक १६ अ - परेश चौघुले(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १७ ब - सुमित पाटील(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १८ अ - अश्विनी फुटाणकर(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १८ ब - दीपा मढवी(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १८ क - शेख अबुसाद अशफाक अहमद(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २३ ब भारती चौधरी(भाजपा)

**● कल्याण डोंबिवली महापालिका**
- प्रभाग क्रमांक ११ अ - रेश्मा निचळ(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १८ अ - रेखा चौधरी(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १९ अ - पूजा म्हात्रे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १९ ब - सुनिता पाटील(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १९ क - साई शेलार(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २३ अ - दीपेश म्हात्रे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २३ क - हर्षदा भोईर(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २३ ड - जयेश म्हात्रे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २४ अ - रमेश म्हात्रे(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक २४ ब - ज्योती पाटील(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २४ क - वृषाली जोशी शिंदेसेना
- प्रभाग क्रमांक २४ ड - विश्वनाथ राणे शिंदेसेना
- प्रभाग क्रमांक २६ अ - मुकुंद पेडणेकर(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २६ ब - रंजना पेणकर(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २६ क - आसावरी नवरे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २७ अ - मंदा पाटील(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २७ ड - महेश पाटील(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २७ ड - महेश पाटील(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २८ अ - हर्षल मोरे(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक २८ ब - ज्योती मराठे(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक ३० ब - रवीना माळी(भाजपा)

**● पनवेल महापालिका**
- प्रभाग क्रमांक १८ अ - ममता म्हात्रे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १८ ब - नितीन पाटील(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १८ क - स्नेहल ढमाले(अपक्ष)
- प्रभाग क्रमांक १९ अ - दर्शना भोईर(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १९ ब - रुचित लोंढे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २० अ - अजय बहिरा(भाजपा)
- प्रभाग क्रमांक २० ब- प्रियंका कांडपीळे(भाजपा)

**● जळगाव महापालिका**
- प्रभाग क्रमांक २ अ - सोनवणे सागर रामकांत(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक ७ अ - काळे दिपाली मनोज(भाजपा)
- प्रभाग क्रमांक ७ ब - पाटील अंकिता पंकजभाजपा)
- प्रभाग क्रमांक ७ क - विशाल सुरेश(राजूभामा) भोळे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक ९ अ चौधरी मनोज सुरेश(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक ९ ब - देशमुख प्रतिमा गजानन(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १२ ब - बेंडाळे उज्वला मोहन (किरण) (भाजपा)
- प्रभाग क्रमांक १३ क - पाटील केशरी अमित(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १६ अ विश्वास सुरेश खडके(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १८ अ - डॉ. सोनवणे गौरव चंद्रकांत(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १९ अ - पाटील रेखा उदयन(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १९ ब - सोनवणे विक्रम किशन(शिंदेसेना)

**● पुणे महापालिका**
- प्रभाग क्रमांक ३५ ब - मंजुषा दीपक नागपुर(भाजपा)
- प्रभाग क्रमांक ३५ ड - श्रीकांत शशिकांत जगताप(भाजपा)

**मालेगाव महापालिका**
- प्रभाग कमांक ६ क - मुनिरा शेख फकीर महंमद इंडियन सेक्युलर लार्जेस्ट अँसेंब्ली ऑफ महाराष्ट्र

**● धुळे महापालिका**
- प्रभाग क्रमांक १ अ - उज्वला रणजित भोसले(भाजपा)
- प्रभाग क्रमांक ६ ब - पाटील ज्योत्स्ना प्रफुल्ल(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १७ अ - मासुळे अमोल पावबा(भाजपा)
- प्रभाग क्रमांक १७ ब - सुरेखा उगले(भाजपा)

**● ठाणे महापालिका**
- प्रभाग क्रमांक ५ अ - चव्हाण सुलेखा सुधाकर(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १४ अ - ढमाले शितल संतोष(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १७ अ - एकनाथ भोईर(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १८ ब - जयश्री फाटक(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १८ क - सुखदा मोरे(शिंदेसेना)
- प्रभाग क्रमांक १८ ड - राम रेपाळे(शिंदेसेना)

**● अहिल्यानगर महापालिका**
- प्रभाग क्रमांक ६ ब - सोनाबाई शिंदे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक ६ ड - करण कराळे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक ७ ब - पुष्पा बोरुडे(भाजपा)
- प्रभाग क्रमांक ८ ड - कुमार वाकळे(राष्ट्रवादी अजित पवार)
- प्रभाग क्रमांक १४ अ - प्रकाश भागानगरे(राष्ट्रवादी अजित पवार)

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाषणात काय म्हणाले?

महानगरपालिका निवडणुकीच्या निकालात पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की महाराष्ट्रात भाजपचे वर्चस्व अबाधित आहे. २९ पैकी २५ महानगरपालिकांमध्ये भाजप आघाडीवर आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. मुंबईत महायुतीला पूर्ण बहुमत मिळणार. महायुतीचा झेंडा फडकणार. विकासाचा अजेंडा घेऊन निवडणुका लढल्या. विकासाच्या अजेंड्याला जनतेने प्रतिसाद दिला आहे. भाजपने रेकॉर्डब्रेक विजय मिळवला. निकालाने स्पष्ट केले की जनतेचा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदींच्य नेतृत्वावर. बाळासाहेब ठाकरे यांचा आशिर्वाद. एक एक शहर परिवर्तीत करुन या शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या आयुष्यात परिवर्तन आणणार. हिंदूत्व हा आमचा आत्मा आहे. आमचे हिंदूत्व सर्वात्मक आहे. हिंदूत्व आणि विकास यांना वेगळं करता येणार आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंचे देखील स्मरण करतो कारण त्यांचा आशीर्वाद आपल्या पाठीशी होता अस म्हणत मुंबईत महायुतीला पूर्ण बहुमत मिळणार. मुंबईत महायुतीचा महापौर होणार असं मोठं वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केले.

# त्या एका बॅनरमुळे मुंबई महापालिकेच्या निकालाचा सस्पेंस वाढला!





■ **मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिकेचे पूर्ण निकाल जाहीर झालेले नाहीत. यामुळे मुंबईत कोण बाजी मारणार याचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. अशातच मुंबईत भाजपच्या पत्रकार परिषदेत झळकलेल्या एका बॅनरमुळे मुंबई महापालिकेच्या निकालाचा सस्पेंस वाढला आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंचे नाव घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस यांनी मोठी घोषणा केली आहे.

मुंबई महापालिकेचे निकाल जाहीर होण्याआधी भाजपने मुंबईत पत्रकार परिषद घेत विजयी जल्लोष साजरा केला. मात्र, याच पत्रकार परिषदेत झळकलेल्या एका बॅनरची चांगलीच चर्चा रंगली आहे. भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्या हातात एक बॅनर देण्यात आला. ठाकरे ब्रँडचा वाजलाय बँड... असा हा बॅनर होता. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी हा बॅनर पाहून नको नको असा इशारा करत हा बॅनर हटवायला सांगितला. यानंतर देवेंद्र धुरंदर असा बॅनर चित्रा वाघ यांच्या हातात देण्यात आला.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# सनातन स्वाभिमान पर्व!



जगप्रसिद्ध सोमनाथ मंदिरावर मोगलांनी केलेल्या पहिल्या आक्रमणाला १ सहस्र वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने 'सोमनाथ स्वाभिमान पर्व'चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेले विचार उपयुक्त आणि समर्पक होते. 'सोमनाथ मंदिर नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न झाले; पण कुणीही ते नष्ट करू शकले नाही, इतके त्या मंदिराचे आणि श्री सोमनाथाचे अद्भुत सामर्थ्य आहे', असा त्यांच्या भाषणाचा मतीतार्थ होता. देशाच्या पहिल्या पंतप्रधानांनी हे मंदिर होऊ नये, यासाठी प्रयत्न केले, तर विद्यमान पंतप्रधानांनी या मंदिराविषयी कृतज्ञता व्यक्त केली. वर्ष १०२६ मध्ये सोमनाथ मंदिरावर पहिले जिहादी आक्रमण झाले. तेव्हापासून आजपर्यंत, म्हणजे १ सहस्र वर्षांतील या मंदिराची वाटचाल खरोखरच बुद्धीअगम्य अशी आहे. यातून सनातन धर्माचे अविनाशत्व सिद्ध होते. 'द्वादश ज्योतिर्लिंग स्तोत्रा'मध्ये भारतातील १२ ज्योतिर्लिंगांचा उल्लेख आहे. त्यामध्ये 'सौराष्ट्रे सोमनाथं च...', असा प्रारंभीच उल्लेख आहे. म्हणजे ज्योतिर्लिंगांमध्ये सर्वांत आधी श्री सोमनाथाचा उल्लेख केला जातो. असे शिवलिंग असलेल्या मंदिराचे चैतन्य महापापी लोकांना कसे सहन होईल? त्यातूनच या मंदिरावर आक्रमणे करून ते नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला. औरंगजेब, गझनी आदी आक्रमकांनी जितक्या वेळा या मंदिरावर आक्रमण केले, तितक्या वेळेला ते पुन्हा त्याच डौलाने उभे राहिले, हा खरोखरच चमत्कार आहे. तेथे साक्षात् भगवान शिवाचा वास आहे, याची यापेक्षा मोठी प्रचीती दुसरी कुठली असू शकेल? ३१ ऑक्टोबर १९४७ या दिवशी तत्कालीन केंद्रीय मंत्री न.वि. गाडगीळ आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी भग्न अवस्थेतील सोमनाथ मंदिराला भेट देऊन मंदिराची पूर्ववत् उभारणी करण्याची घोषणा केली. यास तत्कालीन हिंदुद्वेषी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी शक्य तितका विरोध केला. तरीही हे मंदिर पुन्हा डौलाने उभे राहिले. पाकचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री शाह महमूद कुरेशी यांनी वर्ष २०२१ मध्ये 'मी महमंद गझनीचा वंशज असल्याने पुन्हा सोमनाथ मंदिर पाडणार', अशी गरळओक केली. त्यापाठोपाठ वर्ष २०२३ मध्ये 'ऑल इंडिया इमाम असोसिएशन'चे अध्यक्ष मौलाना महंमद साजिद रशिदी यांनी 'सोमनाथ मंदिर पाडून गझनी याने कोणतीही चूक केली नाही', असे संतापजनक विधान केले. सांगायचे तात्पर्य, स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत काँग्रेसवाले आणि जिहादी प्रवृत्तीचे लोक यांचे मंदिराच्या विरोधात विलक्षण साम्य आढळून येते. अशांना आधुनिक काळातील 'गझनी' म्हणावे का? सोमनाथ मंदिरावरील पहिल्या आक्रमणाला १ सहस्र वर्षे झाली, त्या निमित्ताने 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' आयोजित करण्यात आले. या निमित्ताने प्रत्येक हिंदूचे मन श्री सोमनाथाविषयीच्या कृतज्ञतेने भरून आले. दुसऱ्या बाजूला मात्र औरंगजेब आणि गझनी यांनी केलेली हिंदुद्वेषी कृत्ये आजही चालूच आहेत, हीदेखील वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. त्यांचा वारसा आजचे जिहादी पुढे चालवत आहेत. देश-विदेशातील विशेषतः पाकिस्तान, बांगलादेश आदी इस्लामी देशांतील हिंदूंच्या मंदिरांवर प्रतिदिन ते आक्रमण करून ती नष्ट करत आहेत. देवतांच्या मूर्तींवर लघुशंका करून त्या भ्रष्ट करत आहेत, मूर्तींची तोडफोड करून घोर विटंबना करत आहेत, लव्ह जिहाद करून आया-बहिणींची अब्रू लुटत आहेत, हिंदूंचे बलपूर्वक धर्मांतर करत आहेत, हिंदूंना त्यांचा धर्म विचारून ठार मारत आहेत. आधुनिक गझनींची ही कृत्ये कायदेशीरदृष्ट्या रोखणे आवश्यक आहे. इतिहासातील अन्यायातून शिकून भविष्यातील अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा होणे आवश्यक आहे. औरंगजेब, गझनी यांनी हिंदूंची श्रद्धास्थाने नष्ट करण्यासाठी उभे आयुष्य खर्ची घातले. आजचे आधुनिक औरंगजेब आणि गझनी त्याही पुढे १०० पावले जाऊन सनातन धर्मच नष्ट करू पहात आहेत. त्यासाठी अगदी दंगली, बॉंबस्फोटांपासून ते वर उल्लेखलेली हिंदुद्वेषी कृत्ये, हे जणू त्यांनी त्यांचे जीवनध्येय मानले आहे. त्यांना अनेक देशद्रोह्यांचीही साथ आहे. देव, देश आणि धर्म यांच्या विरोधात बोलणाऱ्यांना 'पुरोगामी' नावाच्या जमातीकडून तात्काळ अभय मिळते. एवढेच काय? पूर्वी त्यांना राजकीय पातळीवरूनही वेळोवेळी सहानुभूती मिळाली आहे. त्यांच्यासाठी व्यक्तीस्वातंत्र्याचा सूर आळवला जातो. या सर्व प्रवृत्तींचा केवळ सनातन धर्मालाच नव्हे, तर या देशालाही तीव्र विरोध आहे. त्यामुळे सरकारने अशांचा योग्य तो बंदोबस्त आताच करणे आवश्यक आहे. दुसरीकडे देव, देश आणि धर्म यांवरील आघातांच्या विरोधात हिंदूंनीही जागरूक रहाणे आवश्यक आहे. त्यासाठी आधी हिंदूंमध्ये जागृती करणे क्रमप्राप्त आहे. यासाठी इतिहासाचा जागर करणे महत्त्वाचे आहे. तथापि आधुनिकतेच्या नावाखाली इतिहास विस्मृतीत ढकलण्याचा, तसेच 'जे झाले ते विसरून पुढे चला', असा फुकाचा सल्ला देण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यांना स्वतःचा इतिहास ठाऊक नसतो, ते भविष्यात स्वतःचे रक्षण करू शकत नाहीत, हाही इतिहासच आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अशा स्थितीत 'सोमनाथ स्वाभिमान पर्वा'सारखे कार्यक्रम हिंदूंची अस्मिता जागवणारे उपक्रम ठरतात. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' हे सिद्ध करतो की, काळ कितीही कठीण असला, तरी सत्य (सनातन) कधीही पुसले जात नाही. अयोध्येतील श्रीराममंदिर, काशीचा कायाकल्प आणि आता श्री सोमनाथाचा हा गौरव सोहळा, ही एका 'सांस्कृतिक महासत्ते'च्या उदयाची नांदी आहे. हा प्रवास भयमुक्त आणि अभिमानयुक्त हिंदु समाजाच्या निर्मितीकडे जाणारा आहे. सोमनाथ मंदिराच्या विध्वंसाच्या घटनांची आठवण करून देणे, म्हणजे द्वेष पसरवणे नव्हे, तर सत्याची जाणीव करून देणे आहे. सत्य स्वीकारल्याविना आत्मसन्मान निर्माण होत नाही आणि आत्मसन्मानाविना स्वाभिमान निर्माण होत नाही. यासाठी आपण इतिहासातून बोध घेऊन वर्तमानात सजग आणि संघटित रहाणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्याला श्री सोमनाथाचे सदैव आशीर्वाद असतीलच. देवाचे देवत्व आपोआप प्रकट होत असते, माणसाला मात्र स्वतःचे कर्तृत्व दाखवावे लागते. देशातील १०० कोटी हिंदूंनी मिळून असा वचक निर्माण करूया की, औरंगजेब, गझनी आदींच्या वारसांचे सनातन धर्म, धर्मग्रंथ, देवता, संत, राष्ट्रपुरुष आदींकडे वक्रदृष्टीने पहाण्याचे धाडस होणार नाही. असे केल्यास सनातन धर्मावलंबितांकडून पिढ्यानपिढ्या 'सनातन स्वाभिमान पर्व' साजरे केले जाईल!

# निवडणुका, नियम आणि नैतिकता



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका केवळ सत्तास्थापनाची प्रक्रिया न राहता नियम, न्याय आणि नैतिकतेची कठोर परीक्षा ठरत आहेत, आणि या परीक्षेत लोकशाहीच अपयशी ठरत असल्याचे चित्र समोर येत आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडणूक, नियम आणि नैतिकता यांच्यातील संघर्ष गेल्या काही वर्षांपासून तीव्र झाला आहे. ओबीसी आरक्षणाच्या वादामुळे २०२२ पासून बहुतांश जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पंचायत आणि महानगरपालिका निवडणुका थांबल्या होत्या. सुप्रिम कोटार्ने जानेवारी २०२६ अखेरपर्यंत सर्व निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले. याला दोन आठवड्यांची मुदतवाढ देण्यात आली. या काळात जिल्हा परिषद निवडणुकीचा रखडलेला पहिला टप्पा जाहीर झाला आहे. इतक्या अल्प कालावधीत मतदारांना, उमेदवारांना आणि छोट्या-मोठ्या राजकीय पक्षांना विचार करायला व प्रचार करायलाही पुरेसा वेळ न देता राज्यातील सर्वच महत्वाच्या निवडणुका पार पडतात ही भूषणावह, पारदर्शी आणि निपक्ष बाब नाही. या प्रक्रियेत गोंधळ, हिंसाचार, पैशाचे वाटप, धार्मिक ध्रुवीकरण आणि अनेक नियमबाह्य बाबी समोर आल्या आहेत, ज्या सक्षम लोकशाहीला घातक आहेत. सात वर्षांपासून रखडलेल्या निवडणुकाही इतक्या घाईगडबडीत उरकल्या जात आहेत की, एकाच पक्षाच्या सोयीने हे सर्व सुरु आहे हे विचारायला सोय नाही.

## आरक्षण आणि निवडणुकीचा विलंब

संविधानाच्या अनुच्छेद २४३डी, २४३टी आणि २४३के नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एस. सी / एस. टी आणि ओबीसी आरक्षणाची तरतूद आहे. मात्र, इंद्रा साहनी (१९९२) खटल्यात निश्चित ५०% आरक्षण मयार्दा ओलांडता येत नाही. २०२१-२२ मध्ये सुप्रीम कोटार्ने ट्रिपल टेस्टची अट घातली. जयंत कुमार बंठिया कमिशनच्या २०२२ अहवालानुसार २७% ओबीसी आरक्षणाचा अहवाल दिला. सरकारने जुन्या धोरणानुसारच निवडणुका घेण्याचे ठरवले पण काही ठिकाणी एकूण आरक्षण ५०% पेक्षा जास्त झाले. सुप्रीम कोटार्ने मे २०२५ मध्ये ५० टक्के आरक्षणाच्या मयार्देत राहून तातडीने निवडणुका सुरू करण्यास परवानगी दिली होती. पण निवडणूक आयोगाने वेळकाढूपणा केला. पुढे १६ सप्टेंबर २०२५ रोजी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचे आदेश दिले. नोव्हेंबर २०२५ मध्ये कोटार्ने स्पष्ट केले की, जिथे ५०% पेक्षा जास्त आरक्षण आहे, तेथील निकाल अंतिम निर्णयावर अवलंबून राहतील. नंतर १२ जानेवारी २०२६ रोजी दोन आठवड्यांची मुदतवाढ मिळाली. अनेक संस्था प्रशासकांच्या हाती असताना वेळेवर निवडणुका घेणे अनिवार्य होते. पण सरकार आणि निवडणूक आयोगाच्या धोरणामुळे जनतेच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाले आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मूळ उद्देशालाच हळताल फसला गेला.

## निवडणुकीतील गोंधळ

नगर पंचायत आणि महापालिका निवडणुकांमध्ये मोठा गोंधळ दिसला. जिल्हा परिषद निवडणुका आधी महानगरपालिका निवडणुका जाहीर झाल्या. काही ठिकाणी १५ दिवसांच्या अल्प काळात कार्यक्रम आखला गेला. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२६ नुसार, उमेदवारांना तयारीसाठी वाजवी वेळ मिळावा. अल्प काळामुळे आदर्श आचारसंहितेचे पालन कठीण झाले. राज्य निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार उमेदवारी अर्ज, छाननी, माघार आणि प्रचारासाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. अल्प कालावधीत मोठ्या प्रमाणात उमेदवारांना तयारीची संधी मिळत नाही, ज्यामुळे स्पर्धा कमी होते आणि बिनविरोध वाढतात. हे लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित करते.

बिनविरोध निवडणुकांमध्ये हिंसाचार, हाणामारी, दमदाटी, पैशाचे वाटप आणि खूनही झाले. आदर्श आचारसंहितेत पैशाचे वाटप आणि हिंसा निवडणूक भ्रष्टाचार हे दंडनिय अपराध आहेत. उच्च न्यायालयाने नुकत्याच बिनविरोध निवडणुकांवरील याचिका फेटाळल्या, पण हे प्रकरण निवडणूक प्रक्रियेच्या अखंडतेवर प्रश्न उपस्थित करते.

शेवटच्या दिवशी प्रचाराला परवानगी देणे आणि ह्यपाडूह्य मशीन आणणे संशयास्पद ठरले. ह्यपाडूह्य हे ईव्हीएमच्या कंट्रोल युनिटचा बॅकअप डिस्प्ले आहे; व्हीव्हीपॅट बंद पडल्यास वापरले जाते. हे भेल कंपनीचे यंत्र आहे आणि शेवटच्या क्षणी आणल्याने राजकीय पक्षांनाही आपल्याला निवडणूक प्रतिनिधींपर्यंत या यंत्राची माहिती पोहोचवणे कठीण असल्याने अनेक आरोप करण्यात आले. बदल पारदर्शक असावेत हा साधा नियम निवडणूक आयोगाला पाळता आला नाही.

महानगरपालिकांचा गोंधळ संपतो न संपतो तोच निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यातील जिथे ५०% आरक्षण मयार्देचा मुद्दा नाही अशा १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छ. संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर यांचा समावेश आहे. यानुसार १६ जानेवारीला अर्ज दाखल करण्यापासून २७ जानेवारीला छाननी आणि ५ फेब्रुवारीला मतदानापर्यंत प्रचारासाठी फक्त ८ दिवसांचा वेळ मिळणार आहे. यानंतर उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका लगेच दुसऱ्या टप्प्यात होणार आहेत.

## धार्मिक ध्रुवीकरण आणि हिंसाचार

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरणाचा मोठा प्रयत्न झाला. लोकप्रतिनिधीत्व कायद्याच्या कलम १२३(३) नुसार, धर्माच्या व समुदायाच्या आधारावर मत मागणे अवैध आहे. सुप्रीम कोटार्नेही निवडणुका धर्मनिरपेक्ष असाव्यात असे सांगितले आहे. निवडणुकांदरम्यान धार्मिक ध्रुवीकरण आणि पैशाचे वाटप हे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन आहे. राज्यभरातून मतदारांना मोठ्या प्रमाणात पैशाचे वाटप झाल्याच्या बातम्या येत होत्या. उमेदवार कार्यकर्तेच पैसे वाटणाऱ्यांना पकडत होते. कुठे मारामाऱ्या सुरु होत्या. या सगळ्यांमध्ये निवडणूक आयोग आणि आचारसंहिता कुठेच नव्हती. मतदानाच्या दिवशीही सगळीकडून ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाल्याच्या बातम्या येत होत्या. मतदान केंद्रात गेलेल्या मतदारांची नावे गायब झाल्याचे दिसून आले. वर्षानुवर्षे परिवारासह एकाच ठिकाणी मतदान करणाऱ्यांची नावेही वेगवेगळ्या प्रभागांमध्ये फेकलेली दिसून आली. सगळीकडे सावळा गोंधळ सुरु होता. मतदाराला सन्मानाने मतदान करण्याचा हक्कही उरला नाही असे वाटावे अशी ही परिस्थिती होती. नैतिकतेच्या दृष्टिकोनातून, निवडणूक ही केवळ नियमांची पूर्तता नव्हे, तर लोकशाही मूल्यांची जपणूक आहे. प्रत्येकाला सोयीने मतदान करता यावे अशी व्यवस्था असली पाहिजे. पैसा, हिंसा, डावपेज आणि ध्रुवीकरण वापरून सत्ता मिळवणे हे नैतिक अधोगतीचे लक्षण आहे. जॉन स्टुअर्ट मिलच्या स्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार, इतरांच्या हक्कांना हानी न पोहोचवणे हेच खरे स्वातंत्र्य असते.

दुबार मतदारांचा गोंधळ शेवटपर्यंत निवडणूक आयोगाला सोडवता आला नाही, सात वर्षे ज्या मुद्द्यावर निवडणुका अडकलेल्या होत्या त्याच ५० टक्केपेक्षा अधिक आरक्षणाचा मुद्दा तसाच कायम ठेवून न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून निवडणुका घेणे हे निवडणूक आयोग आणि सरकारचे अपयश आहे. मतदार आणि उमेदवार कायम जात्यात राहणार आहेत. आदर्श लोकशाहीत या तत्वांना थारा नाही. निवडणुक आयोगावर सरकारच्या सोईने निर्णय घेत असल्याचा पक्षपातीपणाचा निर्णय घेत असल्याचा आरोप परवडणारा नाही. एकाच वेळी घाईघाईत राज्यातील महत्वाच्या सर्वच निवडणुका घेणे हे प्रचंड व्यवस्था असणाऱ्या मोजक्या पक्षांनाच शक्य आहे. बाकी छोटे-मोठे पक्ष आणि अपक्ष या पुरात वाहून गेल्याचे चित्र आहे. निवडणूक आयोगालाही हा भार नीटपणे पेलवता आला नाही हेच खरे. सक्षम लोकशाहीसाठी ही धोक्याची घंटा आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, काळ सोकावतोय.

# एक दिवस दिवाळखोरीची संक्रांत सगळ्यांवर येईल

महापालिका निवडणूक प्रचाराच्या तोफा थंडावल्या. आता उमेदवारांना दारोदार फिरून प्रचार करण्यासाठी अवघे काही तास आहेत. त्यात आज मकरसंक्रांतीचा सण. मतदारांना तीळगूळ देण्यासाठी उमेदवार दारात नक्कीच येणार. मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांमध्ये सात ते आठ वर्षांनंतर निवडणूक होत असल्यामुळे या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तिकीट न मिळालेल्यांचा फक्त रोष नाही तर उद्रेक पाहायला मिळाला. राज्यातील सत्ताधारी तिन्ही पक्ष आणि विरोधातील राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक पक्षांनी आपापल्या स्तरावर शक्य होईल तशा युती आणि आघाडींचा मेळ घातला. त्यामुळे या युती, आघाडीची मिसळ आणि काही ठिकाणी भेसळ पाहायला मिळाली. या निवडणुकीत भाजप, शिवसेना महायुती आणि पवार काका-पुतण्यांच्या राष्ट्रवादीने अनुक्रमे मुंबई आणि पुण्यात दिलेल्या आश्वासनांनी विशेष लक्ष वेधून घेतलं. मुख्यमंत्री फडणवीसांनी मुंबईत बेस्ट बसमध्ये महिलांना अर्धे तिकीट माफ आणि लाडक्या बहिणींना पाच लाखांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज ही योजना त्यांच्या वचननाम्यात सांगितली. तर राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्र्यांच्याच पक्षाविरोधात पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये निवडणूक लढवत असताना मेट्रो आणि शहर बससेवा मोफत करण्याचा शब्द दिला आहे.

दिल्लीमध्ये आम आदमी पार्टी आणि काँग्रेसने अशी आश्वासने दिल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी याला रेवडी कल्चर म्हणून हिणवले होते. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे राज्यात आणि केंद्रातही सत्तेत सहभागी आहेत, तरीही त्यांना पंतप्रधानांच्या या वाक्याचा विसर कसा पडला, असा प्रश्नही आता विचारीजनांना पडायला नको, कारण बिहारमध्ये नरेंद्र मोदींच्या सरकारनेच दहा-दहा हजारांचे वाटप केले होतेच. राज्य सरकारवर लाडक्या बहिणींच्या दरमहिन्याच्या दीड हजारांच्या भाऊबीजेचा आधीच बोजा आलेला आहे. अनेक मंत्री आणि आमदार खासगीमध्ये यामुळे आमच्या खात्याला, जिल्ह्याला निधी मिळत नसल्याची खंत व्यक्त करतात. पीएचडीच्या विद्यार्थ्यांना छात्रवृत्ती द्यायला अर्थमंत्र्यांचा हात आखडता असतो. एका घरात एवढे पीएचडीचे विद्यार्थी कसे असा प्रश्न त्यांना पडतो. मात्र पुणेकरांच्या मोफत प्रवासाठीचे हजारो कोटींचे गणित कसे सोडवता येईल हे ते मांडतात. लाडकी बहीण योजनेसाठी राज्य सरकारच्या तिजोरीतून वर्षाला ४३ हजार कोटी रुपये खर्च होतात. राज्यातील शिक्षण आणि आरोग्य विभागावरदेखील एवढा खर्च होत नाही. या एका योजनेमुळे अनेक योजनांचा खर्च कमी झाला आहे किंवा त्यांना वेळेवर निधी मिळत नाही. मात्र लोकानुनयासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री महापालिकेच्या प्रत्येक सभेत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे सांगत होते. त्यात आता सत्ताधारी दोन पक्षांनी मुंबईत लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्याचे वचन दिले आहे.

पुण्यात मेट्रो, बस प्रवास मोफत करण्याच्या अजित पवारांच्या घोषणेवर, फडणवीसांनी बोलायला आपल्या बापाचं काय जातं, असं म्हणत त्यांच्याच सत्तेतील सहकाऱ्याची टोपी उडवली. मात्र पुण्यात अर्थमंत्र्यांची टोपी उडवताना मुख्यमंत्री मुंबईत आधीच तोट्यात असलेली बेस्ट सेवा आणखी अडचणीत आणणारी घोषणा करतात. बेस्ट प्रवासात महिलांसाठी ५० टक्के सवलतीची घोषणा त्यांनी केली. सत्ताधाऱ्यांनी केलेल्या या घोषणा गांभीर्याने घेण्याचे कारण म्हणजे विधानसभा निवडणुकीनंतर राज्यावर बोजा येत असतानाही लाडकी बहीण योजना सुरूच ठेवावी लागली आहे. भलेही त्यांनी लाभार्थी संख्येला कात्री लावली असली तरी, योजना मात्र सुरूच आहे. त्यामुळे मुंबई आणि पुण्यात दिलेल्या घोषणा हे सत्तेत आल्यानंतर पूर्ण करण्याची खात्री अधिक आहे. यामुळे नागरिकांना मोफत प्रवासाचा लाभ होईल यात शंका नाही, मात्र त्याचा बोजा नागरिकांनाच त्यांच्या इतर महत्त्वाच्या योजनांवर तुळशीपत्र ठेवून परतफेड करावी लागेल त्याचे काय?

मुंबईतील बेस्ट आधीच तोट्यात आहे. तिची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. बेस्टवर कोट्यवधींचे कर्ज आहे. उत्पन्नापेक्षा खर्च वाढलेला आहे. बेस्टला वाढत्या तोट्यामुळे मुंबई महापालिकेकडे दरवर्षी हात पसरावा लागतो. अशा बेस्टवर आणखी ५० टक्के दरकपातीचा भार टाकून बेस्टच मोडीत काढण्याचे षड्यंत्र नाही ना, याचाही मुंबईकरांनी विचार करण्याची गरज आहे. मेट्रोचे जाळे वाढवत असल्याचे सांगताना तिकडे प्रवासी वळवण्यासाठी बेस्टला डबघाईला आणल्याशिवाय बेस्टचे प्रवासी मेट्रोकडे वळू शकणार नाहीत. मुंबईतील सामान्य मुंबईकरांना रोज दोन-अडीच तासांचा जीवघेणा प्रवास करावा लागतो. मुंबईबाहेर फेकल्या जात असलेल्या मराठी माणसाला मुंबईत कसे रोखता येईल, त्यासाठी सत्ताधाऱ्यांकडे काय योजना आहेत? मुंबईकरांना परवडणारी, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था देणं हे महापालिकेचं कर्तव्य आहे. त्यासाठी काय करणार याचा कुठेही उल्लेख नाही, फक्त मोफत दिलं की आपलं काम झालं, असा समज सत्ताधार्यांचा झाला आहे. सामान्य नागरिकाला त्याचे हक्क, अधिकार यांची जाणीवच होऊ द्यायची नाही, त्याला फक्त लाभार्थी म्हणून तयार करायचा जो राष्ट्रीय कार्यक्रम सुरू आहे, त्याविरोधात आता नागरिकांनीच कडवट बोल या घोषणा करणर्यांना सुनावले पाहिजेत. या फुकट्या योजनांचे तीळगूळ खाताना गोड लागत असले तरी एक दिवस दिवाळखोरीची संक्रांत सगळ्यांवर येईल, त्यातून पुन्हा सावरणे अशक्य असेल. आयते खाण्याची सवय लागलेल्या समाजाची वाटचाल ही कुठल्या तरी प्रबळ शक्तीचे गुलाम होण्याकडे होत असते.

# मित्र देश कसे झाले शत्रू?

**सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे दोन्ही सुन्नी मुस्लीम देश आहेत. मध्य पूर्वेत त्यांचा बराच प्रभाव असून ते एकमेकांचे विश्वासू भागीदार मानले गेले आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगायचे, तर हे दोन आखाती महाकाय देश एकेकाळी एकमेकांच्या दयेवर उभे होते. आखाती देश अडचणीत आला, तेव्हा ते एकमेकांची ढाल बनले; पण आज त्यांच्यात शत्रुत्व आहे. हे दोन्ही देश एकमेकांच्या रक्तासाठी तहानले आहेत.**

आखाती प्रदेशातील स्पर्धा ही मुस्लीम देशांचे खलिफा बनण्याची शर्यत आहे. सुरक्षा असो, तेल असो, राजनय असो किंवा प्रादेशिक राजकारण; सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे दोघेही प्रत्येक आघाडीवर एकत्र काम करायचे; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये परिस्थिती बदलली आहे. त्यांच्यातील अविश्वासाची दरी इतकी रुंदावली, की आज शत्रुत्वात बदलली आहे. आता येमेन मुद्द्यावरून सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये तणाव वाढला आहे. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये येमेनच्या भूमीवर संघर्ष सुरू झाला आहे. सौदी अरेबियाने येमेनमध्ये संयुक्त अरब अमिरातीच्या मालकीच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीवर हवाई हल्ला केला. यामुळे सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीमधील संबंध ताणले गेले. सौदी सैन्याने येमेनमधील मुकाल्ला या दक्षिणेकडील बंदरावर वारंवार बॉम्बहल्ला केला. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला. परिस्थिती इतकी बिकट झाली, की येमेनमधील सौदी समर्थित सरकारने संयुक्त अरब अमिरातीच्या सैन्याला देश सोडण्यासाठी २४ तासांचा अल्टिमेटम दिला. त्यानंतर, संयुक्त अरब अमिरातीनेही घाईघाईने आपले उर्वरित सैन्य मागे घेतले. संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी केले, की ते येमेनमधील आपली उर्वरित लष्करी उपस्थिती संपवेल. इतिहासात मागे वळून पाहिले, तर लक्षात येईल, की दोन्ही देशांमधील शत्रुत्व नवीन नाही. दोघे चांगले मित्र राहिले आहेत. अनेकदा आखाती देशांमध्ये या दोन्ही देशांमधील मैत्रीचे दाखले जात होते; परंतु काही हितसंबंधांमुळे ही मैत्री आता शत्रुत्वात बदलली आहे. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) हे आखाती प्रदेशातील दोन प्रमुख मुस्लीम देश एकेकाळी कट्टर मित्र होते. त्यांनी अरब जनांदोलनांपासून येमेन युद्धापर्यंत अनेक कारवायांप्रसंगी एकत्र काम केले; पण आता परिस्थिती बदलली आहे. आर्थिक स्पर्धा, प्रादेशिक प्रभाव आणि वेगवेगळ्या रणनीतींमुळे त्यांना शत्रू बनवले आहे. ही कहाणी शतकानुशतके जुन्या संबंधांपासून सुरू होते आणि आजच्या भू-राजकीय तणावापर्यंत पोहोचते. सौदी अरेबिया सुरुवातीपासूनच संयुक्त अरब अमिरातीचा समर्थक होता. दोन्ही देश सुन्नी मुस्लिमबहुल राजेशाही आहेत. दोघांची अर्थव्यवस्था तेलावर अवलंबून आहे. आखातातील इराणच्या वाढत्या प्रभावाबद्दलची चिंता आणि आखाती प्रदेशात स्थैर्य राखण्याचे सामायिक ध्येय यामुळे त्यांना जवळ आणले गेले होते. दोघांमधील दीर्घकालीन मैत्रीमध्ये इराण हा एक घटक आहे. दोन्ही देशांची मैत्री २०१० च्या दशकाच्या सुरुवातीला घट्ट झाली. क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान (एमबीएस) आणि यूएईचे शासक मोहम्मद बिन झायेद (एमबीझेड) यांनी आपले वैयक्तिक संबंध मजबूत केले. ते इस्लामिक कट्टरतावाद आणि इराणविरुद्ध एकत्र आले. तथापि, हळूहळू तेढ निर्माण झाली. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती हे आखाती प्रदेशात सुरक्षेचे दोन मजबूत आधारस्तंभ मानले जात. २०११ मध्ये जेव्हा अरब स्प्रिंग क्रांतीला वेग आला, तेव्हा त्यांनी येमेनमध्ये इराण समर्थित हौथींविरुद्ध युती स्थापन केली. २०११ च्या अरब स्प्रिंग क्रांतीने मध्य पूर्वेतील राजकारणाला हादरवून टाकले. इजिप्तमधील जनरल सिसी यांच्या सरकारला पाठिंबा देणे असो किंवा लिबिया आणि येमेनमध्ये हस्तक्षेप करणे; दोन्ही देशांनी एकत्र रणनीती आखली. त्यांची जोडी इअरब जगाचे जुळे स्तंभ' म्हणून ओळखली जाऊ लागली. २०११ मध्ये, संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियाने इस्लामी चळवळींविरुद्ध संयुक्त आघाडी स्थापन केली. त्यांनी बहरीनमधील उठाव दडपण्यासाठी संयुक्त सैन्य पाठवले आणि २०१३ मध्ये इजिप्तमधील मुस्लीम ब्रदरहूड सरकारच्या लष्करी हकालपट्टीसाठी सहकार्य केले. मार्च २०१५ मध्ये दोन्ही देशांनी हुथी बंडखोरांविरुद्ध लष्करी मोहीम सुरू केली. संयुक्त अरब अमिरातीने सैन्य पुरवले, तर सौदी अरेबियाने हवाई शक्ती पुरवली. तथापि, २०१९ मध्ये संयुक्त अरब अमिरातीने आपले सैन्य मागे घेतले आणि दक्षिणी फुटीरतावाद्यांना (एसटीसी) पाठिंबा दिला, तर सौदी अरेबिया येमेनी सरकारसोबत राहिला. हा पहिला मोठा वाद होता. जून २०१७ मध्ये दोन्ही देशांनी कतारवर दहशतवादाला पाठिंबा देण्याचा आरोप करत बहिष्कार टाकला. २०२१च्या 'अल-उला' शिखर परिषदेत सौदी अरेबियाने कतारशी समेट केला, तर संयुक्त अरब अमिरातीने सौम्य भूमिका घेतली. सप्टेंबर २०२० मध्ये संयुक्त अरब अमिरातीने इस्रायलशी संबंध सामान्य केले; परंतु सौदी अरेबिया पॅलेस्टिनी राज्याच्या मागणीवर ठाम राहिला. २०२२ मध्ये संयुक्त अरब अमिराती-इस्रायल व्यापार २.५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला; परंतु सौदी अरेबियाने त्यापासून स्वतःला दूर केले. असे म्हटले जाते, की सौदी अरेबियाचे इस्रायलशी असलेले शत्रुत्व आणि संयुक्त अरब अमिरातीच्या इस्रायलशी असलेली जवळीक हे शत्रुत्वाचे एक प्रमुख घटक होते. जुलै २०२१ मध्ये संयुक्त अरब अमिरातीने 'ओपीईसी'मध्ये सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखालील उत्पादन कपात रोखली आणि आपल्या बेसलाइनमध्ये वाढ करण्याची मागणी केली. फेब्रुवारीमध्ये सौदी अरेबियाने परदेशी कंपन्यांना रियाधमध्ये मुख्यालय स्थापन करण्यास सांगितले आणि दुबईला आव्हान दिले. जुलैमध्ये सौदी अरेबियाने संयुक्त अरब अमिरात मुक्त क्षेत्रांमधून आयातीवरील शुल्क उठवण्यास नकार दिला. सुदानी गृहयुद्ध एप्रिल २०२३ मध्ये सुरू झाले. यावेळी संयुक्त अरब अमिरातीने 'रॅपिड सपोर्ट फोर्सेस'ला शस्त्रे पुरवली, तर सौदी अरेबियाने सुदानी सशस्त्र दलांना पाठिंबा दिला आणि युद्धबंदी चर्चा आयोजित केली. डिसेंबर २०२४ मध्ये सीरियामध्ये असद यांना पदच्युत करण्यात आले. दोन्ही बाजूंनी नवीन नेतृत्वाशी संपर्क साधला; परंतु संयुक्त अरब अमिरातीने असद यांच्यावर टीका केली. येमेनमध्ये याच महिन्यात संयुक्त अरब अमिराती समर्थित 'एसटीसी'ने सौदी अरेबियाची 'लाल रेषा' ओलांडून हद्रामौत तेलक्षेत्रे ताब्यात घेतली. सौदी जेट आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात शत्रुत्व सुरू झाले. शत्रुत्वाचा मुख्य स्रोत येमेनमधील मुकाल्ला हे दक्षिणेकडील बंदर होते. सौदीच्या नेतृत्वाखालील युतीने मुकाल्ला बंदरावर हवाई हल्ला केला. सौदी अरेबियाच्या मते त्यांनी संयुक्त अरब अमिराती समर्थित फुटीरतावाद्यांना परदेशी लष्करी मदत पोहोचवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोदीला लक्ष्य केले. सौदी अरेबियाने स्पष्टपणे सांगितले, की हा हल्ला संयुक्त अरब अमिरातीच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीला लक्ष्य करत होता. तथापि, संयुक्त अरब अमिरातीने सौदी अरेबियाचे दावे फेटाळून लावले आणि म्हटले, की हल्ला केलेल्या मालवाहतुकीत शस्त्रे नव्हती, तर संयुक्त अरब अमिरातीच्या लष्करासाठी पुरवठा आणि उपकरणे होती. ही पहिली आणि नवीनतम थेट चकमक होती. या महिन्याच्या सुरुवातीपासूनच सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या आखाती देशांमधील तणाव सातत्याने वाढत आहे. संयुक्त अरब अमिरातीने केलेल्या घोषणेमुळे हा तणाव कमी होत असल्याची अटकळ निर्माण झाली. असे असूनही, दोन्ही देशांच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षांमधील संघर्ष अधिकाधिक स्पष्ट होत आहे. संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे, की ते येमेनमधून आपली उर्वरित लष्करी उपस्थिती मागे घेईल. आम्ही २०१५ पासून अरब युतीचा भाग आहोत आणि येमेनमधील कायदेशीर सरकारला पाठिंबा देत आहोत. संयुक्त अरब अमिरातीच्या सैन्याने २०१९ मध्ये येमेनमधील आपले मुख्य लष्करी ऑपरेशन पूर्ण केले आणि परतले; परंतु अतिरेकी शक्तींना रोखण्यासाठी काही सैन्य मागे ठेवण्यात आले होते. तथापि, अलिकडच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, संरक्षण मंत्रालय उर्वरित सैन्य मागे घेण्याचे आवाहन करत आहे. हा तात्पुरता शह असला, तरी गेल्या दशकभरातील शत्रुत्व पाहता या दोन देशांमधील संघर्ष संपण्याची शक्यता कमीच आहे.

# शेवयांचा उपमा

**सकाळचा नाश्ता म्हटले की, पोहे, उपमा, शिरा हे ठरावीक पदार्थ खायला मिळतात. एका सकाळी आपल्याला शेवयांचा उपमा करता येईल. खवय्यांना आवडेल अशी ही स्वादिष्ट डिश आहे.**

**साहित्य :** शेवया, नारळ, मटार, चणाडाळ, टोमॅटो, लाल मिरची, गोडेतेल, कढीपत्ता, कांदे, मोहरी, हिंग, मीठ, जिरे.

**कृती :** कढईत शेवयांचा चुरा तांबूस रंग येईपर्यंत भाजा. भाजताना तेल नको. पाणी गरम करून ठेवा. एका पातेल्यात तेल गरम करून त्यात हिंग, मोहरी, जिरे, मिरच्यांचे तुकडे, कढीपत्ता, भिजलेली डाळ, कांदा, हळद सर्व टाकून लालसर होईपर्यंत परतून घ्यावे. त्यात गरम केलेले पाणी टाकून मीठ टाकावे. चवीला साखर, कोथिंबीर, नारळाचा चव घालून उकळावे. उकळलेल्या पाण्यात भाजलेल्या शेवयांचा चुरा घालावा व त्या शिजवाव्यात.



# चेहऱ्यावर सुरकुत्या होण्यामागील मुख्य ७ कारणे



**आपणासदेखील असं वाटत की आपले वय कमी आहे, पण सुरकुत्यांमुळे चेहऱ्यावरील चार्म गमावत आहे, तर त्यामागे बरीच कारणे असू शकतात. चला तर मग चेहऱ्यावर सुरकुत्या होण्यामागील कारणे जाणून घेऊया. सुरकुत्या सरत्या वयाचा एक भाग आहे. कॉलेजनचे उत्पादन वेळेनुसार कमी होतं, ज्यामुळे आपली त्वचा लवचिकता गमावून बसते. सरत्या वयासह सुरकुत्या होणे स्वाभाविकच आहे, पण अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे अकालीच सुरकुत्या दिसू लागतात. यामधील काही तर आपल्या दररोजच्या सवयीमुळे देखील असू शकत. जसे की साखरेचे सेवन किंवा सूर्याच्या प्रकाशात जास्त काळ राहिल्यामुळे आपल्या त्वचेवर फाईन लाइन्स दिसू लागतात. तथापि अद्याप उशीर झालेला नाही. आपण इच्छित असल्यास आपल्या दिनचर्येत आवश्यक बदल करून या सुरकुत्यांना चेहऱ्यावर येण्यापासून रोखू शकता.**

**आपल्या त्वचेला घासणे :** जर आपण जोराने आपल्या चेहऱ्याला मेकअप वाईप किंवा टॉवेलने चोळत असाल किंवा आयलायनर लावण्यासाठी आपल्या डोळ्याच्या भोवतीच्या त्वचेला ताणत असाल, तर यामुळे देखील सुरकुत्या येऊ शकतात. वारंवार असे करण्याची सवय आपल्या त्वचेसाठी नुकसानदायी होऊ शकते.

**पुरेशी झोप न घेणं :** आपण झोप घेता त्यावेळी कॉर्टिसॉल( तणावाचे हार्मोन)ची पातळी स्वाभाविकरीत्या कमी होते. हे आपल्या त्वचेला दिवसभराच्या तणावापासून मुक्त होण्यासाठी नैसर्गिकरीत्या त्वचेला या चक्रातून जाऊ देतं. जर आपल्याला आवश्यक सौंदर्यवर्धक झोप मिळत नसेल तर आपण या चक्रात व्यत्यय आणत आहात. कॉर्टिसॉलचे उच्च स्तर कॉलेजन तोडून सुरकुत्या वाढवतात.

**प्रदूषण :** आपल्या सर्वांसाठी प्रदूषणाची वाढती पातळी वाईट आहे, हे तर सर्वांनाच माहीत आहे. धूर, धूळ आणि धुकं यापासून त्वचेच्या फ्री रॅडिकल्सला नुकसान होतं. यामुळे अकाली वृद्धत्व आणि सुरकुत्या येऊ लागतात. नकारात्मक प्रभावाला कमी करण्यासाठी दिवसाच्या शेवटी आपल्या चेहऱ्याला स्वच्छ करावे.

**आपली झोपण्याची स्थिती :** जर आपल्याला पोटावर किंवा हाताला उशीखाली दाबून झोपण्याची सवय असल्यास, बराच काळ असे केल्यानं आपल्या चेहऱ्यावर काही डाग येऊ शकतात. याचा परिणाम रात्रभर दिसून येत नाही, पण नंतर लक्षात येतो. यापासून वाचण्यासाठी पाठीवर झोपण्याचा प्रयत्न करा आणि त्वचेच्या सुरकुत्यांना कमी करण्यासाठी रेशीम किंवा सॅटिनची उशी वापरा.

**उच्च साखरयुक्त आहार घेणं :** साखर आपले वजन वाढवण्यात आणि त्वचेला अकाली वृद्ध करण्यात योगदान देते. साखर विरघळल्यावर ही ग्लायकेशन नावाच्या प्रक्रियेतून जाते. मुळात, ही कॉलेजन आणि इलॅस्टीनला बांधते आणि त्यांना कमकुवत करते. यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या दिसून येतात.



**सनस्क्रीन न लावणं :** सूर्यापासून निघणारे यूव्ही किरण आपल्या त्वचेवरील सुरकुत्यांसाठी सर्वात जास्त जबाबदार असतात. असुरक्षित असणाऱ्या अल्ट्राव्हायोलेट प्रकाशाच्या संपर्कात येऊन कॉलेजन खराब होऊ शकतं, ज्यामुळे फाईन लाइन्स आणि सुरकुत्या होऊ शकतात. म्हणून आपल्या त्वचेला वाचवण्यासाठी नेहमी सनस्क्रीन वापरा.

**डिहायड्रेड त्वचा :** आपल्या त्वचेला सुरकुत्यांपासून वाचवण्यासाठी नेहमी हायल्युरोनिक ॲसिड असणाऱ्या उत्पादनांचा वापर करावा. हे आपल्या त्वचेतील ओलावा टिकवून ठेवते, ज्यामुळे डोळ्याच्या भोवती बनणाऱ्या फाईन लाइन्स कमी होतील. तसेच स्वतःलादेखील आतून हायड्रेट ठेवा. दिवसभरातून किमान ८ ग्लास पाणी पिण्याचा नियम बनवा.

# अपुऱ्या झोपेमुळे होतात हे त्रास

**प्रत्येक व्यक्तीला दररोज पुरेशी विश्रांती मिळणे आवश्यक असते. व्यक्तीनुसार झोपेचे प्रमाण बदलत असले तरीही चांगल्या आरोग्यासाठी किमान सात तासांची झोप घेणे आवश्यक असते. ही झोप सलग असली पाहिजे. झोपेमध्ये खंड पडला तर शरीराला त्याचा फारसा उपयोग होत नाही. अनेकांना रात्री जागरण करण्याची सवय असते. मात्र, ही सवय कालांतराने आरोग्यासाठी घातक ठरू शकते. झोप पूर्ण झाली नाही तर व्यक्तीच्या शरीरावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. अपुऱ्या झोपेमुळे उद्भवणारी काही लक्षणे पाहूयात...**

■ **भावनिक अस्वस्थता :** पुरेशी झोप न झाल्यामुळे व्यक्ती विनाकारण चिडचिड करते. बऱ्याच काळापासून शरीराला आवश्यक असणारी विश्रांती मिळाली नाही तर त्याचा परिणाम व्यक्तीच्या भावनांवर होतो. त्यामुळे व्यक्तीचा मूड सातत्याने बदलत राहतो.

■ **विसरभोळेपणा :** योग्य तितकी झोप न झाल्यास व्यक्तीमध्ये विसरभोळेपणा वाढतो. याचे प्रमाण काही वेळा इतके वाढते की अगदी काही काळापूर्वी तुम्ही केलेली गोष्टही तुम्हाला सहज आठवेनाशी होते.


■ **नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे :** अपुरी झोप ही तुमच्या स्मरणशक्तीवर परिणाम करते. झोप झाली नसल्यास मेंदूला जास्त ताण द्यावा लागतो आणि त्यामुळे नवीन गोष्टी शिकण्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असते.

■ **अकाली वृद्धत्व :** आपण लवकर वयस्कर व्हावे असे कोणत्याच व्यक्तीला वाटत नाही. मात्र पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींच्या त्वचेवर लवकर सुरकुत्या पडतात. त्यामुळे व्यक्ती वयस्कर दिसू लागतात.

■ **लठ्ठपणा :** पुरेशी झोप न झालेल्या व्यक्तींचे शारीरिक गणित बिघडते. अन्नाचे योग्य प्रकारे पचन होत नाही. तसेच त्यांना वारंवार भूक लागण्याचीही शक्यता असते. त्यामुळे लठ्ठपणा वाढू शकतो.

■ **कर्करोग होण्याची शक्यता :** अपुऱ्या झोपेमुळे आपल्या शरीराचे नव्हे तर मेंदूचे कार्यही बिघडते. अपुरी झोप ही प्रोस्टेट कर्करोग, स्तनांचा कर्करोग यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरू शकते.

■ **कमी प्रतिकारशक्ती :** अपुऱ्या झोपेमुळे शरीरातील प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते. त्यामुळे अशा लोकांना संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता जास्त असते.



# इन्स्टाग्रामवरून करायचा आहे का व्हिडीओ कॉल, मग फॉलो करा या स्टेप्स

**इन्स्टाग्रामवर व्हिडीओ कॉलिंग हे जबरदस्त फीचर जोडण्यात आलं आहे. याच्या माध्यमातून तुम्ही व्हिडीओ कॉल करून तुमच्या मित्रांशी संवाद साधू शकता.**

इन्स्टाग्राम आपल्या कंटेंट आणि फीचर्सच्या जोरावर सध्या एक लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्म बनलं आहे. या प्लॅटफॉर्मवर फोटो आणि व्हिडीओ शेअर करण्यासोबतच व्हिडीओ कॉलदेखील करता येतो. जर तुम्हालादेखील हे फीचर वापरायचं असेल आणि जर तुम्हाला पद्धत माहीत नसेल तर टेंशन घेऊ नका. आम्ही तुम्हाला या आर्टिकलमध्ये व्हिडीओ कॉल करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्यामुळे तुम्ही तुमच्या मित्र-मैत्रिणींशी फेस-टू-फेस संवाद साधू शकता.

## इन्स्टाग्राममध्ये अशाप्रकारे करा व्हिडीओ कॉल

- तुमच्या मोबाईलमध्ये इन्स्टाग्राम ॲप ओपन करा.
- उजवीकडे असलेल्या मेसेज आयकॉनवर क्लिक करा.
- चॅट लिस्टमधून तो कॉण्टॅक्ट निवडा, ज्याला तुम्हाला व्हिडीओ कॉल करायचा आहे.
- त्यानंतर उजवीकडे असलेल्या कॅमेरा आयकॉनवर क्लिक करा.
- त्यानंतर व्हिडीओ कॉल सुरू होईल.
- अशाप्रकारे तुम्ही व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून तुमच्या मित्र-मैत्रिणींशी बोलू शकता.



व्हिडीओ कॉल दरम्यान तुम्ही काय करू शकता...

- व्हिडीओ कॉलदरम्यान तुम्ही फोनचा कॅमेरा स्विच करू शकता.
- मायक्रोफोन आयकॉनवर क्लिक करून तुम्ही माइक म्यूट करू शकता.
- स्माइली फेस आयकॉनवर टॅप करून तुम्ही व्हिडीओ कॉलमध्ये इफेक्ट ॲड करू शकता.

लक्षात असू द्या व्हिडीओ कॉल करण्यापूर्वी वाय-फाय किंवा डेटा कनेक्शन सुरळीत असेल याची काळजी घ्या. ज्यामुळे तुम्ही अगदी सहज व्हिडीओ कॉलिंग करू शकाल. तसेच तुम्हाला व्हिडीओ क्वालिटीदेखील चांगली मिळेल. विशेष म्हणजे कॉलिंग दरम्यान तुम्ही ४ लोकांना जोडू शकता आणि चार लोकांशी एकाचवेळी बोलू शकता. महत्त्वाची बाब म्हणजे ज्यांना व्हिडीओ कॉल करायचा आहे, त्यांनी इन्स्टाग्राम नोटिफिकेशन ऑन केलेल्या असाव्यात, तसेच ते ऑफलाइन असल्यास व्हिडीओ कॉल नोटिफिकेशन त्यांना जाणार नाहीत. सोशल मीडिया ॲप इन्स्टाग्रामनं गेल्या वर्षी किशोरवयीन मुलांचा विचार करून नाइट टाइम नज फीचर लॉंच केलं होतं. ही सुविधा रिमाइंडरप्रमाणे चालते. जेव्हा किशोरवयीन मुलं ॲपवर १० मिनिटांपेक्षा वेळ घालवतील तेव्हा त्यांना ॲप बंद करण्याचा रिमाइंडर मिळेल.

# पोटाचा घेर कमी करायचा आहे? मग जाणून घ्या घोसाळी खाण्याचे फायदे

**गौरी**–गणपतीसारखे सण, उत्सव आले की अनेक घरांमध्ये घोसाळ्याच्या भज्यांचा वास घमघमू लागतो. साधारणपणे आपल्याला कांदाभजी, बटाटाभजी, पालकभजी असे भज्यांचे प्रकार माहीत आहेत. मात्र, या सगळ्यांमध्ये घोसाळ्याची भजीदेखील तितकीच खुमासदार लागतात. बऱ्याच वेळा घोसाळ्याची भजी खाण्यासाठी लोक नाकं मुरडतात. मात्र, घोसाळ्याची भजी किंवा भाजी खाण्याचे अनेक फायदे आहेत. मुळात घोसाळं हे शरीरासाठी अत्यंत गुणकारी आहे. त्यामुळे त्याचे नेमके फायदे कोणते ते जाणून घेऊयात.



▮लघवी साफ होते. ▮कफ झाल्यास घोसाळ्याचा रस प्यावा. त्यामुळे उलटी होऊन कफ बाहेर पडतो. ▮पोट साफ होतं. ▮जखम बरी होते. ▮पोटाचा घेर कमी होतो. ▮मूतखड्यावर गुणकारी ▮थकवा दूर होतो.

# जपा संत्र सेवनाचा मंत्र!

संत्री खाताना काळजी घ्यावी. सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो. आंबट गोड चवीची, पिवळ्या केशरी रंगाची संत्री सगळ्यांच्या आवडीची असतात. संत्र्यात भरपूर प्रमाणात 'अ', 'ब' आणि 'क' जीवनसत्त्व असतं. साधारण थंडीत संत्र्यांचा हंगाम सुरू होतो. महाराष्ट्रात नागपूरमध्ये संत्र्याचं पीक मोठ्या प्रमाणात घेतलं जातं. संत्र्यापासून ज्यूस, जॅम, जेली, अत्तर , सुगंधी तेल, चूर्ण असे अनेक पदार्थ तयार केले जातात. पण फक्त खाद्यपदार्थ किंवा सौंदर्य पदार्थच नाही, तर आरोग्याच्या अनेक समस्यांवर संत्रे फायदेशीर आहे. चला तर या संत्र्याचे फायदे जाणून घेऊयात.

■ भूक मंदावणे, पोटात गॅस होणे अशा समस्यांवर संत्र्याचा रस प्यायल्यास खूप आराम पडतो.

■ मळमळल्यासारखं होत असल्यास संत्र्याची साल हुंगल्यास लगेच आराम पडतो.

■ पचनशक्ती वाढवण्यासाठी संत्र खावे.

■ मलावरोधाचा त्रास होत असल्यास रात्री झोपण्यापूर्वी संत्र्याच्या फोडी पांढऱ्या सालीसकट खाव्यात, सालीतील तंतुमय पदार्थामुळे शौचास साफ होते.

■ संत्र्यामध्ये असणाऱ्या 'क' जीवनसत्त्वामुळे दातांच्या अनेक समस्या दूर होतात.

■ थकवा, अशक्तपणा जाणवत असल्यास संत्रे खावे.

■ हंगाम संत्री आवर्जून खावी, कारण त्वचेचे सौंदर्य सुधारण्यासाठी संत्रे मदत करते.

■ संत्रे ही थंड असतात. अति उष्णतेचा त्रास झाल्यास संत्र्याचा रस प्यावा.

■ संत्र्याची साल वाळवून त्यापासून चूर्ण तयार करावे. हे सूक्ष्म चूर्ण चेहऱ्यावर लावल्यास मुरुमे व पुटकुळ्या दूर होऊन त्वचा कांतियुक्त होते.


■ संत्र्याच्या नियमित सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

पण संत्री खाताना काळजी घ्यावी, सर्दी, खोकला झाला असेल तर अति आंबट चवीचे व कच्चे संत्रे खाऊ नये, त्यामुळे खोकला अधिकच वाढू शकतो.



# व्यायामापूर्वी अशी घ्या त्वचेची काळजी

**आपण आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी व्यायाम करतो. पण त्यामध्ये आपल्या त्वचेची काळजी घेतली जात नाही. असे बरेच कमी लोक असतात, जे वर्क आऊट्सच्या पूर्वी आपल्या त्वचेची योग्यरीत्या काळजी घेतात. असं करणं फार महत्त्वाचं असत. कारण वर्क आऊट्सच्या दरम्यान भरपूर घाम येतो आणि जर आपली त्वचा स्वच्छ नसेल तर घाणेरड्या त्वचेवर घामामुळे बॅक्टेरिया अधिक वाढू शकतात. याशिवाय व्यायामाच्या दरम्यान आपल्या त्वचेचे निर्जलीकरण होते. चला तर मग आज आम्ही आपल्याला सांगत आहोत की, व्यायामापूर्वी त्वचेची काळजी कशी घ्यावी...**



**त्वचा** तज्ञ म्हणतात की, जेव्हा आपण वर्क आऊटसाठी जात असाल तेव्हा मेकअपपासून शक्य असेल तेवढे वाचावे. हे आपल्या छिद्र आणि घामाच्या ग्रंथींना अवरोधित करतात, यामुळे आपल्या त्वचेला श्वास घ्यायला अडचण होते. म्हणून आपण वर्क आऊट करायला जाण्यापूर्वी आपल्या त्वचेला चांगल्या प्रकारे स्वच्छ करून घ्या. यासाठी आपण एखाद्या फेसवॉशने चेहरा स्वच्छ करणे अधिक चांगले राहील.

**मॉइश्चरायझिंग करणे आवश्यक**

त्वचेची काळजी घेणारे तज्ञ म्हणतात की, त्वचा स्वच्छ केल्यावर तिला मॉइश्चराइझ करणे देखील आवश्यक आहे. वास्तविक वर्क आऊट्स दरम्यान आपल्या त्वचेमधून भरपूर घाम येतो, जे आपल्या त्वचेचे निर्जलीकरण करतो. अशा परिस्थितीत त्वचेचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी मॉइश्चराइझ करणं आवश्यक असतं. म्हणून जेव्हा आपण आपला चेहरा स्वच्छ कराल तेव्हा आपल्या चेहऱ्यावर मॉइश्चरायझर आणि लिप बाम लावा, कारण वर्क आऊट केल्यावर आपले ओठ कोरडे होतात आणि फाटतात.



**एसपीएफ संरक्षणाला दुर्लक्षित करू नका :** त्वचा तज्ञ म्हणतात की, प्री-वर्क आऊट त्वचेची काळजी घेताना सूर्याच्या किरणांपासून संरक्षण करणे देखील महत्त्वाचे आहे. जर आपण वर्क आऊट दरम्यान मैदानी व्यायाम करण्याची योजना आखत असाल, तर जसे की बागेत जाऊन धावणे किंवा बाहेरच योगा करत असाल तर बाहेर जाण्यापूर्वी सनस्क्रीन लावणे विसरू नका.

**अँटिपर्सीपरंट लावा :** हे खरे आहे की आपल्याला व्यायामशाळेत किंवा वर्क आऊट्स करताना खूप घाम गाळावा लागतो. तर आपल्या बगलेला अँटिपर्सीपरंट रोलऑन करून बॅक्टेरिया आणि जंताचे घर होण्यापासून संरक्षण करा.



# हरभरा खाण्याचे 'हे' फायदे वाचून व्हाल चकित!

**हिवाळा ऋतू सुरू झाला की बाजारात ऊस, संत्री, गाजर, हरभरा, आवळे अशी फळे दिसू लागतात. या सगळ्यामध्ये अनेकांचं लक्ष वेधून घेतो तो म्हणजे हरभरा. हिरवागार हरभरा पाहिला की महिला वर्गाच्या डोक्यात अनेक वेगवेगळ्या भन्नाट रेसिपी घुमू लागतात. मग संपूर्ण हिवाळा ऋतू संपेपर्यंत ओल्या हरभऱ्याची चटणी, घावणं, पाल्याची भाजी असे वेगवेगळे प्रकार प्रत्येकाच्या स्वयंपाक घरात होऊ लागतात. या ओल्या हरभऱ्याचे अनेक गुणकारी फायदे आहेत. विशेष म्हणजे केवळ ओल्या हरभऱ्याचेच नव्हे, तर चणे किंवा हरभरा डाळीचं पीठ (चणाडाळीचं पीठ) हेदेखील शरीरासाठी बहुगुणी ठरत असल्याचं दिसून येतं.**

■ हरभऱ्यामध्ये मॅलिक ॲसिड, ऑक्झालिक ॲसिड यांचं प्रमाण असल्यामुळे आम वांत्या (उलटी), अपचन या समस्या दूर होतात.

■ हरभरा स्नायूवर्धक आहे. त्यामुळे व्यायाम करणाऱ्यांनी हरभऱ्याचं नियमित सेवन केल्यास फायदेशीर ठरू शकतं.

■ ओल्या हरभऱ्याच्या पानांमध्ये लोहाचं पुरेपूर प्रमाण असतं. त्यामुळे शरीरात लोहाची कमतरता असलेल्या व्यक्तींनी हरभऱ्याच्या पानांची भाजी खावी.

■ कोणत्याही प्रकारचा त्वचाविकार असल्यास हरभरा डाळीचे पीठ प्रभावी जागेवर लावावे.

■ डाळीच्या पिठाने रंग उजळतो. चेहऱ्यावर मुरुमे असतील तर एक चमचा दही घेऊन त्यात थोडंसं डाळीचं पीठ घालावं. त्यानंतर हा लेप चेहऱ्यावर लावावा. यामुळे चेहऱ्यावरील मुरुमं कमी होतात.

■ केस रुक्ष किंवा कोरडे असतील तर डाळीच्या पिठाने केस धुवावेत.

■ घाम येऊन शरीरातून दुर्गंधी येत असल्यास अंघोळ करताना डाळीच्या पिठाचा लेप लावावा.

**'या' व्यक्तींनी हरभरा खाऊ नये**

▮हरभरा डाळ पचण्यास जड आहे. तसंच ती उष्ण, तुरट-गोड चवीची आहे. त्यामुळे वातदोष वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच, वातप्रकृतीच्या व्यक्तींनी हरभरा डाळ किंवा हरभऱ्याचं सेवन करू नये.

▮हरभरा पचण्यास जड आहे. त्यामुळे पचनशक्ती मंद असणाऱ्यांनी किंवा अपचनाचा त्रास होणाऱ्यांनी हरभऱ्याचं सेवन टाळावं. तसंच डाळीच्या पिठापासून केलेले पदार्थ देखील जास्त खाऊ नयेत.

# नावडते असले तरी आठवड्यातून एकदा कारले खावेच!

'**कडू** कडू कारले, बाजारात फिरले त्याला पाहून नाक भेंडीने मुरडले'. लहानपणी भाज्यांवर आधारित एका 'बडबड गीता'मध्ये कारल्याचे वर्णन अशाप्रकारे केले होते. कारले किंवा कारल्याची भाजी म्हटली की सगळेच नाक मुरडतात, पण ही कारली कितीही कडू असली तरी आरोग्य मात्र उत्तम ठेवतात. कारल्यामध्ये कॅल्शिअम, लोह, फॉस्फरस 'अ', 'क' जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असते. आपल्याकडे कारल्याची भाजी सहसा कोणी करत नाही, केलीच तर मीठ टाकून तिच्यामध्ये असलेले सारे पौष्टिक घटक काढून टाकतात. कारल्यातलं पाणी काढून टाकलं की ती कमी कडू लागते, असा अनेक गृहिणींचा समज आहे. पण, यामुळे भाजीतील जीवनसत्त्व पूर्णपणे वाया जाते याची कल्पना त्यांना नसते. कारल्याला आयुर्वेदात खूप महत्त्व आहे. फक्त भाजीसाठीच नाही तर औषधांमध्येही कारल्याचा वापर केला जातो. कारले कितीही नावडते असले तरी आहारात आठवड्यातून किमान एकदा तरी या फळभाजीचा समावेश असलाच पाहिजे.

**कारल्याचे फायदे**

■ कारल्याच्या रसामुळे रक्त शुद्ध होते, त्यामुळे त्वचाविकार होण्याचा धोका कमी होतो.

■ कावीळ झाल्यास ताज्या कारल्यांचा रस सकाळ-संध्याकाळ घेतल्यास यामुळे कावीळ दूर होते.

■ यकृताच्या सर्व विकारांमध्ये कारल्याचा रस फायदेशीर असतो.

■ जंत किंवा कृमींचा त्रास असल्यास कारल्याची भाजी किंवा रस घेतल्यानं कृमींचा त्रास कमी होतो.

■ दमा, सर्दी, खोकल्याचा त्रास असेल तर कारल्याचा रस व तुळशीच्या पानांचा रस एकत्र करून त्यात मध मिसळून महिनाभर घेतल्यास रोगप्रतिकार शक्ती वाढून हे त्रास दूर होतात.

# रात्री चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ

**निरोगी आणि सुदृढ आरोग्य हवं असेल तर आहारात पौष्टिक पदार्थांचा समावेश करा, असा सल्ला कायमच डॉक्टरांकडून दिला जातो. त्यासोबत सकाळचा नाश्ता भरपेट करावा, दुपारचं जेवण थोडं कमी करावं आणि रात्रीचं जेवण अत्यंत हलकं घ्यावं, असंही म्हटलं जातं. मात्र, अनेकदा आपण याकडे दुर्लक्ष करतो. अनेकदा काही जण रात्रीच्या जेवणात मसालेदार पदार्थ, फास्टफूड यांचा समावेश करतात.मात्र, ते शरीरासाठी अत्यंत चुकीचं आहे. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी कोणत्या पदार्थांचं सेवण करणं टाळलं पाहिजे, हे जाणून घेऊयात.**

**भात :** अनेकांना रात्री भात खाल्ल्याशिवाय झोप येत नाही. मात्र, रात्रीच्या वेळी भात खाल्ल्यामुळे शरीरात अतिरिक्त चरबी निर्माण होण्याची शक्यता असते. रात्री भात खाल्ल्याने पोटाकडील चरबी वाढते.

**फास्ट फूड/तेलकट पदार्थ :** पिझ्झा, बर्गर, फ्राईज यासारखे फास्ट फूड आणि तळलेले पदार्थ रात्रीच्या वेळी खाणे टाळा. अपचन किंवा ॲसिडिटीमुळे निद्रानाश होऊ शकतो.



**चॉकलेट :** काही जणांना रात्री जेवण झाल्यावर गोड खाण्याची सवय असते. त्यामुळे बऱ्याच वेळा चॉकलेट खाल्लं जातं. मात्र, चॉकलेट हे कितीही आवडीचे असले तरी झोपण्यापूर्वी ते खाऊ नका. कारण चॉकलेट्समध्येही काही प्रमाणात कॅफेन असते. तेव्हा रात्रीच्या वेळी चॉकलेटच्या अतिसेवनामुळे झोपेवर परिणाम होऊ शकतो.

**मांसाहारी पदार्थ :** रात्रीच्या वेळी मांसाहार पूर्णपणे वर्ज्य करावा. कारण, मांस पचायला २४ ते ७२ तासांचा कालावधी लागतो. यामुळे वजन तर वाढतेच, पण रात्री अपचनामुळे झोपमोडही होऊ शकते. तेव्हा मांसाहार करणे टाळा.

**चायनीज पदार्थ :** चायनीज पदार्थांमध्ये एमएसजी अर्थात मोनोसोडियम ग्लुटामेट असते. आरोग्याच्या दृष्टीने तो घातक असतोच पण त्यामुळे निद्रानाशही होऊ शकतो.

दरम्यान, रात्री जेवण केल्यानंतर एक-दोन तासांतच आपण झोपी जातो, त्यामुळे पचनक्रिया मंदावते. अशावेळी फारच कमी खाणे किंवा हलके-फुलके खाणे फायद्याचे ठरेल. अनेक पदार्थ हे पचायला जड असतात, त्यामुळे रात्री शक्यतो कमी खाण्याचा सल्ला दिला जातो. तेव्हा रात्री जेवताना काही पदार्थ खाणे हे आवर्जून टाळले पाहिजे.



# ईव्हीएम नेणारी बस अडवली, वाहनांची तोडफोड अन्...
# ठाण्यात मतमोजणीपूर्वी राडा, नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार, ठाण्यातील ब्रह्मांड येथील सेंट झेवियर्स मतदान केंद्राबाहेर मतदानाची वेळ संपल्यानंतर ईव्हीएम (एव्हट) मशीन सील करून त्या स्ट्राँगरूमकडे नेण्याची प्रक्रिया सुरू होती. याच वेळी अपक्ष उमेदवार भूषण भोईर हे मतदान केंद्रात शिरले आणि त्यामुळे वादाला तोंड फुटले. ईव्हीएम मशीन पळवून नेण्याचा प्रयत्न होत आहे अशा अफवा पसरवण्यात आल्या. या संशयावरून दोन्ही बाजूचे शेकडो समर्थक आमनेसामने आले. या गोंधळात मतपेट्या घेऊन जाणारी बस अडवण्यात आली. काही वाहनांच्या काचा फोडण्याचा प्रयत्न झाला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी राज्य राखीव दलाच्या मदतीने सौम्य लाठीमार केला.

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

राज्यातील महापालिका निवडणुकांची धामधूम अंतिम टप्प्यात आली आहे. ठाणे महानगरपालिका निवडणूक २०२६ साठी काल गुरुवारी १५ जानेवारीला मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मानपाडा परिसरातील प्रभाग क्रमांक ३ मध्ये राजकीय संघर्षाने हिंसक वळण घेतले. ब्रह्मांड येथील सेंट झेवियर्स मतदान केंद्राबाहेर माजी महापौर मीनाक्षी शिंदे आणि अपक्ष उमेदवार भूषण भोईर यांच्या समर्थकांमध्ये तुफान राडा झाला. यावेळी जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. त्यामुळे सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.




या राड्यानंतर दोन्ही नेत्यांनी एकमेकांवर गंभीर आरोप केले आहेत. माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांनी दावा केला की, भूषण भोईर यांनी मुद्दाम बाहेरून गुंड प्रवृत्तीची माणसे आणि हत्यारे आणली होती. एखाद्याचा बळी घेण्याचा हा पूर्वनियोजित कट होता, असा आरोप त्यांनी केला. तर दुसरीकडे, भूषण भोईर यांच्या समर्थकांनी असा आरोप केला आहे की, शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनी भोईर यांच्या डोळ्यात मिरचीची पूड फेकून त्यांना इजा करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान प्रभाग ३ मध्ये ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची बनली आहे. शिवसेनेने उमेदवारी नाकारल्यामुळे भूषण भोईर यांनी बंडखोरी करत अपक्ष पॅनल उभे केले आहे. प्रचारादरम्यान मीनाक्षी शिंदे यांची आगरी समाजाबद्दलची एक कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. तेव्हापासून या भागात ठिणगी पडली होती. मतदानाच्या दिवशी पैसे वाटपाच्या आरोपावरून ठाकरे गट आणि शिंदे गटात शाब्दिक चकमकी उडाल्या होत्या. त्यातच आता झालेल्या या वादामुळे हा प्रभाग प्रतिष्ठेचा बनला आहे.

दरम्यान खासदार नरेश म्हस्के यांनी घटनास्थळी धाव घेत मीनाक्षी शिंदे यांची भेट घेतली. बोगस मतदानाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांनी स्पष्ट केले की, सर्व मतपेट्या आता स्ट्राँगरूममध्ये सुरक्षित आहेत आणि अफवा पसरवणाऱ्यांवर कडक लक्ष ठेवले जात आहे. आजची मतमोजणी शांततेत पार पडण्यासाठी संपूर्ण परिसरात मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

# टाटा मुंबई मॅरेथॉनसाठी मेट्रो ३ ची विशेष सोय...

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

२०२६ ची 'टाटा मुंबई मॅरेथॉन' येत्या रविवारी, १८ जानेवारीला होणार असून, या मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या हजारो धावपटूंना वेळेत पोहोचता यावे, यासाठी मुंबई मेट्रो ३ कडून विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मॅरेथॉनच्या दिवशी ॲ०४ छल्ली वर पहाटेपासून अतिरिक्त व लवकर सुरू होणाऱ्या मेट्रो सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाने दिली आहे.




**मुंबई मेट्रो ३चे विशेष वेळापत्रक**

- टाटा मॅरेथॉन दरम्यान धावपटू प्रवाशांच्या सोयीसाठी पुढीलप्रमाणे अतिरिक्त गाड्या सोडण्यात येतील.
- सकाळी ३:३० वाजता – आरे जेव्हीएलआर व कफ परेड येथून (दोन्ही टर्मिनल्सवरून पहिली ट्रेन)
- सकाळी ४:३० वाजता – आरे जेव्हीएलआर येथून दुसरी ट्रेन
- सकाळी ४:५० वाजता – कफ परेड येथून दुसरी ट्रेन

मेट्रो ३ च्या अधिकृत वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, "मॅरेथॉनसाठी लवकर निघताय? अॅक्वा लाईनसोबत तुमचा प्रवास करा अधिक जलद व सोयीस्कर. टाटा मुंबई मॅरेथॉनच्या निमित्ताने १८ जानेवारी रोजी अतिरिक्त मेट्रो सेवा प्रवाशांसाठी उपलब्ध असतील. सुरक्षित, सोयीस्कर आणि वेळेत प्रवास करा.

**मॅरेथॉन कधी सुरू होणार?**

- मॅरेथॉनची सुरुवात : पहाटे ५.०० वाजता
- सुरुवातीचे ठिकाण : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस
- अंतर : ४२.१९५ किमी
- समाप्तीचे ठिकाण : एमजी रोड येथील मुंबई जिमखाना

शेकडो धावपटूंची पहाटे प्रवासाची गैरसोय होऊ नये, तसेच मॅरेथॉनसाठी वेळेत पोहोचता यावे, यासाठी मेट्रोने ही विशेष सोय करण्यात आली आहे.

## उत्तर भारतात शीतपेटीइतका हातपाय सुन्न करणारा गारठा
# शीतलहरींचा महाराष्ट्रावर अनपेक्षित परिणाम



■नांदेड। प्रतिनिधी,

केंद्रीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार दिल्ली, उत्तर भारत आणि अतीव उत्तरेकडे असणाऱ्या राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढणार असल्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. शिमला, मसूरी, श्रीनगर अशा भागांमध्ये थंडीचा कडाका प्रचंड वाढणार असून, दिवसा सूर्यप्रकाश अधिक प्रखर असला तरीही हाडं गोठवणारी थंडी या भागांतून काढता पाय घेणार नाही. महाराष्ट्रावरही या शीतलहरींचा परिणाम होणार असून, दिवसा सूर्यप्रकाश अधिक तीव्र असेल तर, रात्री आणि पहाटे गारठा अधिक असेल असा स्पष्ट इशारा आयएमडीनं जारी केला आहे.

इथं महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून दक्षिणेकडून येणाऱ्या वाऱ्यांचा अधिक प्रभाव पाहायला मिळाला. ज्यामुळं वातावरण बहुतांशी ढगाळ होतं. मात्र, आता ही स्थिती निवळल्यामुळं राज्यातील किमान आणि कमाल तापमानात २ ते ३ अंशांनी चढ-उतार होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. राज्यात प्रामुख्यानं मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात २ ते ३ अंशांची तापमानात घट अपेक्षित असून, त्यानंतर मात्र तापमानात वाढ होण्यास सुरुवात होईल असा अंदाज आहे.

मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि कोकण किनारपट्टीवर आकाश निरभ्र आणि काही भागांमध्ये ढगाळ राहील. तर, मुंबईत सरासरी तापमानाचा आकडा ३२ ते ३३ अंशांदरम्यान असेल. किमान आकडा १७ अंशांदरम्यान राहील. ज्यामुळं हवेत गारठा कायम राहणार आहे. कोकणातही अशीच स्थिती असून, दुपारच्या वेळी असणारा उष्मा मात्र असह्य होऊ शकतो असा इशारा आहे. राज्याच्या पहाटे गारठा अधिक असेल घाट क्षेत्रात पहाटे आणि सायंकाळी गारठा पाहायला मिळू शकतो. थंडीचा जोर इथं तुलनेनं कमी असला तरीही अल्हाददायक गारठा मात्र आणखी काही दिवस मुक्कामी असेल.

**थंडीची लाट आणखी तीव्र होणार... धुक्याची लाट अडचणी वाढवणार**

स्कायमेट या खासगी हवामान संस्थेनं देशातील हवामानाविषयी वर्तवलेल्या अंदाजानुसार दिल्लीपासून वर उत्तरेकडे पुढील ४८ तासांचा कालावधी अती थंडी आणि धुक्याचा असेल. देशाच्या राजधानीमध्ये थंडीची लाट सक्रिय होणार असून, त्यानंतर मात्र तापमानात वाढ होईल. १६ जानेवारी २०२६ रोजी आणखी एक पश्चिमी झंझावात हिमालय क्षेत्रामध्ये प्रवेश करत असून, त्याचा परिणाम पर्वतीय भागांमध्ये दिसून येईल. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड्या पर्वतीय भागांमध्ये पश्चिमी झंझावातामुळं बर्फवृष्टी आणि पावसाच्या इशाऱ्यामुळं हातपाय सुन्न पाडणारी थंडी असेल असा प्राथमिक अंदाज आहे. तर, पुढील २ ते ३ दिवस उत्तर भारतात दाट धुक्यामुळं वाहतुकीवरही थेट परिणाम होताना दिसतील. बहुतांशी उत्तरेकडे हवामान कोरडं असेल, तर दक्षिणेकडे मात्र हवामानातील दमटपणा वाढेल असा इशारा हवामान यंत्रणांनी जारी केला आहे.

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने उद्घाटनाच्या अवघ्या १९ दिवसांमध्ये १ लाख प्रवाशांचा टप्पा पार केला



या कालावधीदरम्यान एनएमआयएने ७३४ एअर ट्रॅफिक मूव्हमेंट्सचे (एटीएम) व्यवस्थापन केले, ज्यामध्ये ३२ जनरल एव्हिएशन एटीएमचा समावेश होता. यामधून नियोजित व जनरल एव्हिएशन ऑपरेशन्समध्ये वाढता वापर दिसून येतो. एकूण ४०,२६० आगमन बॅग्ज आणि ३८,७७४ प्रस्थान बॅग्ज प्रोसेस करण्यात आल्या, यामधून सामानाची कार्यक्षमपणे हाताळणी करण्याची क्षमता दिसून येते, ज्यामुळे प्रवाशांना अधिक कंम्फर्ट देण्याचा मनसुबा आहे.

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने मोठा ऑपरेशनल टप्पा गाठला आहे, जेथे व्यावसायिक कार्यसंचालनांना सुरुवात केल्याच्या पहिल्या १९ दिवसांमध्ये एक लाख प्रवाशांचा टप्पा पार केला आहे. यामधून प्रवाशांची मोठी पसंती आणि प्रवास मागणीमधील स्थिर वाढ दिसून येते. १२ जानेवारी २०२६ पर्यंत एनएमआयएने एकूण १,०९,९१७ प्रवाशांची हाताळणी केली, ज्यामध्ये ५५,९३४ प्रवाशांनी आगमन केले, तर ५३,९८३ प्रवाशांनी प्रस्थान केले. एअरपोर्टने १० जानेवारी २०२६ रोजी सर्वाधिक व्यस्त दिवसाची नोंद केली, जेथे एका दिवसामध्ये ७,३४५ प्रवाशांची हाताळणी करण्यात आली. मालवाहतूकीसंदर्भात एनएमआयएने २२.२१ टन कार्गोची हाताळणी केली, यामधून विमानतळाचा सुरुवातीपासून प्रवासी व मालवाहतूक कार्यसंचालनांप्रती एकीकृत दृष्टिकोन दिसून येतो. कनेक्टीव्हीटीसंदर्भात दिल्ली, गोवा व बेंगळुरू प्रमुख क्षेत्रे ठरली. आधुनिक पायाभूत सुविधा, सुव्यवस्थित प्रक्रिया आणि ऑपरेशनल कार्यक्षमतेवर फोकससह एनएमआयए टप्प्याटप्प्याने सेवा वाढवत आहे, तसेच सुरक्षितता, सेवा दर्जा आणि प्रवाशांना उत्साहवर्धक प्रवास अनुभव देण्याचे उच्च मानक राखत आहे.

# कुख्यात गुंडाला पाठलाग करुन संपवले



■सांगली। प्रतिनिधी,

सांगली शहरातील शामरावनगर येथे सराईत गुन्हेगाराचा पाठलाग करून निर्घृणपणे हत्या करण्यात आला. तिघं सराईत गुन्हेगारांनी केलेल्या हल्ल्यात चैतन्य आप्पासाहेब तांदळे हा जागीच ठार झाला. चैतन्य तांदळे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी हत्येचा गुन्हा दाखल होता. काल शुक्रवारी रात्री चैतन्य तांदळे हा शामरावनगर येथील त्याच्या मित्राकडे गेला होता. त्यावेळी त्या ठिकाणी दबा धरून बसलेल्या तिघा सराईत गुन्हेगारांनी त्याच्यावर चाकूने हल्ला चढवला. या घटनेनं शहरात खळबळ उडाली आहे. सांगलीत सराईत गुन्हेगाराची हत्या करण्यात आली आहे. त्याच्यावर जेव्हा हल्ला झाला तेव्हा प्रतिहल्ला करण्यासाठी चैतन्य तांदळे यानेही स्वतः जवळचा चाकू काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तिघांनी चाकूने चैतन्य याच्या मानेत, डोक्यावर आणि पोटात हल्ला केला. तसेच त्याच्या डोक्यात पेवर ब्लॉक घालून त्याचा खून केला. पूर्व वैमनस्यातून त्याची हत्या झाल्याचं समोर आलं आहे. हल्लेखोरांच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखा आणि सांगली शहर पोलिसांची पथके रवाना करण्यात आलेत. दरम्यान महापालिका निवडणुकीच्या काळात सांगली शहरात नऊ दिवसात ही दुसरी हत्या झाली आहे. सांगलीत सतत होत असणाऱ्या हत्येच्या घटनेमुळे खळबळ उडालीये. राज्यभरात महापालिका निवडणुकींचा धुरळा सुरु आहे. प्रत्येक पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते आपला उमेदवार जिंकून यावा यासाठी प्राचाराला लागले आहेत. उमेदवार घरोघरी जाऊन मतदारांना आपल्याला मतदान करण्याचं आवाहन करत आहेत. तर नेतेमंडळी विविध शहरांमध्ये जाऊन प्रचार रॅलीत सहभागी होत आहे. तिथे प्रचारसभा घेत आहेत. या प्रचारसभांमधून विरोधकांवर निशाणा साधला जात आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर आता महापालिका निवडणुका होत आहेत. महापालिका निवडणूक ही मिनी विधानसभा निवडणूक मानली जाते. कारण राज्यातील २९ महत्त्वाच्या शहरांमध्ये ही निवडणूक होत आहे. पण या निवडणुकीत काही अनपेक्षित घटना समोर आली आहे. सांगलीत एका उमेदवाराच्या आईने स्वतःला संपवून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

# नांदेडमध्ये महिला उमेदवाराच्या पतीवर जीवघेणा हल्ला, तपासात धक्कादायक माहिती समोर, हल्ला राजकीय नसून...

■नांदेड। प्रतिनिधी,

निवडणुकीच्या प्रचारादरम्यान विरोधात भाषण केल्यामुळे काँग्रेस महिला उमेदवार सारिका भालेराव यांच्या पतीवर दुचाकीवर आलेल्या सहा अज्ञात हल्लेखोरांनी जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. सुदैवाने या हल्ल्यात महिला उमेदवाराचे पती बचावले आहेत. प्रभाग क्रमांक एकमध्ये हा थरार मंगळवारी १३ जानेवारी रात्री उशिरा घडला होता. शिवाजी भालेराव, असं महिला उमेदवाराच्या पतीचं नाव आहे. झालेला हा हल्ला हा राजकीय नसून दरोडा असल्याचं आता समोर आलं आहे.

प्रभाग क्रमांक एकमधून काँग्रेसने शिवाजी भालेराव यांच्या पत्नी सारिका भालेराव यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे. मंगळवारी १३ जानेवारी सायंकाळी प्रचार संपल्यानंतर उमेदवाराचे पती शिवाजी भालेराव हे आपल्या मित्रासोबत थांबले होते. याचदरम्यान दुचाकीवर आलेल्या



काही अज्ञात हल्लेखोरांनी तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, सुदैवाने तलवारीचा वार चुकवल्याने ते बचावले. 'निवडणुकीत विरोधात भाषण का केलं, तुझा बियाणी करतो', अशी धमकी हल्लेखोरांनी दिली, असं काँग्रेस उमेदवाराच्या पतीने सांगितलं.

यापरकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. त्यावरुन नांदेड हद्दीतील बेलानगर तरोडा बु. येथे आरोपी असल्याचं समजलं. अरूणोदय नगर नांदेड येथील विहाराजवळ सापळा रचून संशयित आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्यांनी व त्यांचे इतर साथीदार यांनी मिळून महिला उमेदवाराचे 'पती हे पैसे वाटत आहे', असं समजून त्यांच्याशेजारी ठेवलेली बॅग चोरून नेल्याची कबुली दिली.

दरम्यान, आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेला एक खंजर जप्त करण्यात आला. तसेच मोटार सायकल पोलिसांकडून जप्त करण्यात आली आहे. घटनास्थळावरून चोरलेली बॅग ज्यामध्ये कपडे व रोख रक्कम दहा हजार रुपए असलेली हस्तगत केली आहे. सदरचा गुन्हा १२ तासाचे आत उघडकीस आणला असून सदरची कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.



**संशयितांना अटक**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयितांना अटक केली आहे. रितेश दिपक पंडित (वय २२), शुभम संजय नरवाडे (वय १९), संघर्ष महेंद्र वगर (वय १९), चांदेश ऊर्फ ओमकार कोंडीबा जाधव (वय १८) आणि वैभव गोपाळ थोरात (वय १९) असं अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावं असून दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांचा यात समावेश आहे. हे सर्व नांदेड शहरातील रहिवासी आहेत.

# आंतरजातीय प्रेमविवाह, ८ महिन्यांचा मुलगा...
## पण शेवटी वडिलांनीच मुलीचा संसार केला उद्धवस्त!

■मुंबई । प्रतिनिधी,

बिहारच्या मुजफ्फरपूर येथून ऑनर किलिंगचं एक खळबळजनक प्रकरण उघडकीस आलं आहे. आपल्या मुलीने प्रेमविवाह केल्यामुळे तिच्या वडिलांनी तिचा संसार उद्धवस्त केल्याचं सांगितलं जात आहे. मुलीने लव्ह मॅरेज केल्याने संतापलेल्या वडिलांनी आपल्याच जावयाचा गोळी झाडून त्याची हत्या केल्याची माहिती आहे. घटनेनंतर, आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. आता, या धक्कादायक घटनेने गावात एकच खळबळ उडाली आहे.

**गोळी झाडून जावयाची निर्घृण हत्या...**

संबंधित घटना ही सिवाईपट्टी पोलीस स्टेशन हद्दीतील बंगरा गावातील असून आयुष कुमार असे मृताची ओळख समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री आयुष घरात एकटाच असताना हल्लेखोर अचानक त्याच्या घरात घुसले आणि त्याच्यावर गोळी झाडली. त्यानंतर, आयुष रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. गोळी झाडल्याचा आवाज ऐकून गावकरी गोळा झाले परंतु, अंधाराचा फायदा घेत आरोपी तिथून फरार झाले.

घटनेची माहिती मिळताच, पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि प्रकरणाचा तपास सुरू केला. त्यानंतर, तरुणाचा मृतदेह ताब्यात घेऊन तो पोस्टमॉर्टमसाठी एसकेएमसीएच रुग्णालयात पाठवण्यात आला. आता, घटनास्थळावरून पुरावे गोळा केले जात असून परिसरातील लोकांची चौकशी सुरू आहे.

**माहेरच्या कुटुंबियांवर पतीच्या हत्येचा आरोप**

मृताची पत्नी तनु कुमारी हिने तिच्या माहेरच्या कुटुंबियांवर गंभीर आरोप केले आहेत. तिने थेट तिच्या आई-वडिलांवर आणि मामावर आपल्या पतीच्या हत्येचा आरोप केला आहे. तनुने सांगितलं की १५ ऑगस्ट २०२४ रोजी तिने आयुषसोबत लव्ह मॅरेज केलं होतं. मात्र, तनुच्या कुटुंबियांना त्यांचं लग्न मान्य नव्हतं. लग्न झाल्यापासूनच तिला आणि तिच्या पतीला जीवे मारण्याच्या धमक्या मिळत असल्याचा आरोप तनुने केला. त्या दोघांना एक ८ महिन्यांचा मुलगा असून या घटनेने कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृताच्या पत्नीच्या जबाबावरून एफआयआर नोंदवण्यात आला आहे. प्रकरणाच्या सर्व बाजूंनी कसून चौकशी केली जात आहे. तसेच, आरोपींना अटक करण्यासाठी सतत छापे टाकले जात आहेत आणि लवकरच संपूर्ण प्रकरणाचा उलगडा होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.




# सरपंचाच्या मुलाचे दुसऱ्या जातीतील मुलीशी प्रेमसंबंध
## आईने विरोध करताच इंग्लंडमध्ये रचला खुनाचा कट... घरी पोहोचताच काटा काढला

■मुंबई। प्रतिनिधी,

हरियाणाच्या यमुनानगर येथून एका भयानक हत्याकांडाचं प्रकरण समोर आलं आहे. मुलाने आपल्या आईची निर्घृण हत्या केल्याची माहिती आहे. आरोपी तरुण हा शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये राहायला होता.

**आई आणि मुलाच्या नात्यात तणाव**

२४ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास यमुनानगरच्या श्यामपूर गावातील सरपंचाची पत्नी तिच्या घरात मृतावस्थेत आढळली. संबंधित महिलेचं नाव बलजिंदर कौर असून तपासादरम्यान, तिचा मृत्यू संशयास्पद असल्याचं समोर आलं. गावातील सरपंचाच्या पत्नीचा मृत्यू झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकरणाचा तपास क्राइम ब्रांचकडे सोपवण्यात आला. पोलिसांनी तपास सुरू करताच, बलजिंदर कौरचा मुलगा गोमित राठी याचं नाव समोर आलं. गोमित हा शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये राहत असून तिथल्याच एका स्टोरमध्ये नोकरी करत असल्याचं गावकऱ्यांना माहीत होतं. मात्र, आई आणि मुलाचे संबंध तणावाचे असल्याने पोलिसांना वेगळाच संशय आला.



दुसऱ्या जातीतील तरुणीसोबत प्रेमसंबंध अन्...

खरं तर, गोमितचं वागणं त्याच्या कुटुंबियांसाठी चिंताजनक होतं. या प्रकरणाचा तपास केला असता, गोमितचे दुसऱ्या जातीतील तरुणीसोबत प्रेमसंबंध असल्याकारणाने त्याच्या कुटुंबात सतत वाद होत असल्याचं समोर आलं. बलजिंदर कौर तिच्या मुलाच्या प्रेमसंबंधाला विरोध करत होती कारण, एक आई म्हणून तिला तिच्या मुलाला योग्य मार्गावर आणायचं होतं. घरातील नेहमीच्या वादाला कंटाळून, आई-वडिलांनी गोमितला इंग्लंडमध्ये पाठवलं. घरापासून दूर राहिला तो सुधारेल, हेच त्यामागचं कारण होतं. परंतु, गोमितच्या मनात तर सुडाची आग पेटत होती आणि यातूनच त्याने मोठा कट रचला.

**गावातील गोठ्यात लपून बसला अन् आईची हत्या...**

गोमित राठी १८ डिसेंबर रोजी कोणालाच न सांगता इंग्लंडहून भारतात परतला होता. त्याचा जवळचा मित्र पंकजने त्याला त्याच्या या प्लॅनमध्ये सहभागी करून घेतलं. गोमित १८ डिसेंबर ते २४ डिसेंबर पर्यंत गावातील एका गोठ्यात लपून बसला. हजारो मैल दूर प्रवास करून घरी परतण्याऐवजी, सहा दिवस तो गोठ्यातील घाणीत आणि प्राण्यांमध्ये लपून बसला. दरम्यान, पंकजने गोमितचं जेवण आणि इतर गोष्टींची सोय करून ठेवली होती. २४ डिसेंबरच्या रात्री, संधी मिळताच गोमित गोठ्यातून बाहेर पडला आणि त्याने त्याच्या घरात प्रवेश केला. त्याची आई, बलजिंदर कौर, तिथे एकटी होती. त्यावेळी, गोमितने त्याच्या आईवर हल्ला केला आणि स्वतःच्या हातांनी तिचा गळा दाबून खून केला. हत्येनंतर, गोमितने तो अपघात असल्याचं भासवण्यासाठी त्याच्या आईचा मृतदेह घरातील पाण्याच्या टाकीत फेकून दिला. मात्र, पोलिसांच्या टेक्निकल तपासामुळे तो वाचू शकला नाही. तपासादरम्यान, गोमितचं मोबाईल लोकेशन ट्रेस केलं असता ते इंग्लंडमध्ये नसून यमुनानगरमध्ये असल्याचं उघडकीस आलं. अखेर, पोलिसांनी आरोपीची कठोर चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबूल केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटिंग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com